प्रकरण २ रे

# गंगाधर पानतावणे यांचे वाङ्मयीन व्यक्तित्त्व व स्तंभलेखन

# प्रकरण २ रे
# गंगाधर पानतावणे यांचे वाङ्मयीन व्यक्तित्त्व व स्तंभलेखन

## प्रस्तावना

मराठीतील ज्येष्ठ साहित्यिक, समाज प्रबोधनाची चळवळ करणारे विचारवंत, समीक्षक, दलित साहित्याचे भाष्यकार गंगाधर पानतावणे 'अस्मितादर्श' या नियतकालिकाच्या रूपाने सशक्त प्रबोधनकारी व्यासपीठ निर्माण केले तसेच दलित साहित्य चळवळीला व्यापक परिमाण दिले. दलित वाङ्मयाबद्दल मौलिक विचार मांडले. नव्या-जुन्या लेखकांना लिहिते केले. प्रतिभेचे अंकुर असणाऱ्या कित्येक लेखक कवींना आत्मविश्वास दिला. हे त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. कविता, नाटक, समीक्षा, संशोधनपर लेख, वैचारिक लेखन तसेच स्तंभलेखन असे विविध साहित्यप्रकार हाताळून त्यांनी मराठी साहित्याला बहुआयामी रूप प्राप्त करून दिले.

गंगाधर पानतावणे यांचा जन्म २८ जून १९३७ मध्ये झाला. गंगाधन पानतावणे यांचे मूळ गाव नागभूमी आहे. त्यांचे शिक्षण एम.ए., पीएच.डी. झालेले आहे. त्यांनी विविध साहित्यप्रकारामध्ये लेखन केले आहे. महाराष्ट्रातील सर्व स्तरांवरील आणि साहित्याच्या सर्व प्रवाहांमधील लेखनकृतींना डॉ. पानतावणे यांनी लिहिलेल्या प्रस्तावना. यातुनही त्यांची संतुलित, ठाम, समांतर विवेकदृष्टी जाणवते. गंगाधर पानतावणे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद या ठिकाणी मराठी विषयाचे प्रोफेसर व विभागप्रमुख म्हणून काम केले. तेथूनच ते निवृत्त झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासून १४ ऑक्टोबर १९५६ रोजी त्यांनी नागपूरच्या धम्मदीक्षा समारंभात दीक्षा घेतली. तसेच 'पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर' हा डॉ. पानतावणे यांचा ग्रंथ बाबासाहेबांच्या पत्रकारितेवर प्रकाश टाकतो. डॉ.पानतावणे यांनी बाबासाहेबांच्या पत्रकारितेवर संशोधन करून पीएच. डी. पदवी मिळवली आणि त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे ही पीएच. डी. त्यांनी कोणत्याही मार्गदर्शकाशिवाय मिळवली आहे. यावरून त्यांची संशोधक दृष्टी लक्षात येते व त्यांचे साहित्य संशोधनातील वेगळेपणही लक्षात येते.

## गंगाधर पानतावणे यांचे साहित्य लेखन

गंगाधर पानतावणे यांनी वेगवेगळ्या प्रकारचे लेखन केले आहे. विविध विषयावरील समग्र लेखन करणाऱ्या डॉ. गंगाधर पानतावणे यांनी सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, तात्विक अशा प्रकाराची केलेली चर्चा महत्त्वपूर्ण आहे. लेख, समीक्षा, चरित्र, संशोधनात्मक ग्रंथलेखन त्यांनी

BARR. ... LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

केलेले आहे. त्यांची वैचारिक भूमिका मूल्यवेध (१९७६), विद्रोहाचे पाणी पेटले (१९७६), दलितांचे प्रबोधन (१९८४), वादळाचे वंशज (१९८२), प्रबोधनाच्या दिशा (१९८४), चैत्य (१९९०), आणि साहित्य प्रकृती व प्रवृत्ती (१९९०) इ. मध्ये त्यांचे वैचारिक लेखन झाले आहे.

मूल्यवेध हा त्यांचा ग्रंथ वैचारिक ग्रंथाची समीक्षा करणारा म्हणजेच त्यातील विचारमूल्यांचा वेध घेणारा आहे. यामध्ये त्यांनी तात्विक भूमिका, त्यांचे स्वरूप, मर्यादा आणि विसंगती या सर्वांचा वेध अत्यंत समतोल आणि परखडपणे घेतलेला आहे. प्रा. गो. मो. रानडे यांच्या 'महाराष्ट्रातील समाजविचार' या ग्रंथाची केलेली चिकित्सा वैशिष्ट्यपूर्ण व महत्त्वाची आहे.

लालजी पेंडसे यांच्या 'सप्तपदी व नवमतवाद' या ग्रंथातील वैचारिकतेचे स्वरूपही त्यांनी स्पष्ट केले आहे. पानतावणे यांनी प्रारंभीच पेंडसे यांच्या साक्षेपी, बहुश्रुत, तर्कशुद्ध व अनुग्राही वृत्तीचा गौरवाने उल्लेख करतात. पेंडसे यांनी यामध्ये सामाजिक समस्यांची चर्चा केली आहे. याबद्दल पानतावणे यांनी आर्थिक उत्पादनामुळे आर्थिक व सामाजिक पद्धतीत विलक्षण क्रांती झाली. या ठाम विधानाची भारतीय समाजवास्तव अथवा व्यवहारातील मर्यादा दर्शवून समाजातील वस्तुस्थिती मांडली आहे. त्यामध्ये काही प्रश्न उपस्थित केले आहेत. उदा. ''नवनव्या चालीरीती आल्या, स्त्रियांचा वारसा हक्क आला, मिश्र विवाह झाले, अस्पृश्यवर्गाच्या समतेच्या चळवळी झाल्या. त्याला कारण केवळ उत्पादन होय, असे म्हणता येईल का ? यांत्रिक उत्पादनामुळे आर्थिक पद्धतीत क्रांती झाली. पण सामाजिक पद्धतीत नाही. फुले, आगरकर, शिंदे, भाऊराव पाटील, डॉ.आंबेडकर ह्यांनी समाजक्रांतीचे प्रयत्न केले. काही फसले तर काही फळाला आले. मग समाज-क्रांतीचे श्रेय यंत्रोत्पादनाला द्यायचे तर समाजसुधारकांचा 'आक्षेप' मिथ्या म्हणावा काय ?''[१] असे प्रश्नार्थक विचार मांडून समाजपरिवर्तन आणि इतिहासनिर्मिती प्रक्रियेमध्ये मानवालाही महत्त्वाचे स्थान असते हे ते सांगतात. यातून त्यांची इतिहासाकडे पाहण्याची आंबेडकरवादी दृष्टी स्पष्ट होते.

डॉ. वा. ना. कुबेरांनी 'डॉ. आंबेडकर विचारमंथन' या ग्रंथामध्ये अस्पृश्यांचा उद्धार केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या विचारांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. या प्रयत्नातील एकांगीपणा आणि विपर्यस्तपणा डॉ. पानतावणे यांनी स्पष्ट केला आहे.

'विद्रोहाचे पाणी पेटले आहे' हा त्यांचा १९७६ साली प्रकाशित झालेला दुसरा महत्त्वाचा ग्रंथ आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी आंबेडकरी चळवळीतील निष्ठावान कार्यकर्ते, शाहीर, कवी, लेखक, विचारवंत यांच्या कार्याचा आणि विचारांचा मागोवा घेतला आहे. काही अज्ञात व्यक्तींबद्दलची

माहिती त्यांनी संकलित केली आहे. शाहीर घेगडे, आण्णा भाऊ साठे, ना. रा. शेंडे, केरुबुवा गायकवाड, वामनदादा कर्डक, कवी दीनबंधु, बंधु माधव, शंकरराव खरात, शि. जा.कांबळे, कि. फा. बनसोडे अशा जुन्या नव्या कार्यकर्त्यांचा, विचारवंतांचा, सृजनशील लेखकांचा त्यामध्ये समावेश आहे. वरील सर्व लेखकांनी दलितांमध्ये सामाजिक आणि वैचारिक जाणीव निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. दलितांच्या वेदना त्यांनी आपल्या लेखनाद्वारे मांडण्याचा प्रयत्न केला. त्यांचे हे मौलिक कार्य व प्रेरणा या ग्रंथामध्ये मांडण्याचा प्रयत्न केला. उदा. शंकरराव खरातांच्या विचारावर लिहिताना त्यांनी मांडलेली भूमिका महत्त्वाची आहे. शंकरराव खरातांच्या अनुषंगाने त्यांनी महाराष्ट्रातील वैचारिक आणि ज्ञानव्यवहारातील जातीभेद स्पष्ट केला आहे. या संदर्भात ते म्हणतात की, ''दलितांच्या लढ्याची कारणमीमांसा व फलित याचा विचार करताना खरात अभिनिवेशापासून मुक्त असतात. पुष्कळदा असे आढळून येते की, दलितांनी आपले प्रश्न मांडले की दुराग्रहाचा वास येतो. तेच प्रश्न दलितेतरांनी मांडले की, त्यात समाजसुधारणा गवसते. खरातांनी दलितांच्या प्रश्नांची केलेली मांडणी वस्तुनिष्ठ तर आहे पण ती अधिक तत्त्वनिष्ठ स्पष्टीकरणाच्या भूमिकेची आहे. दलितांच्या स्वतंत्र विद्यापीठाची मागणी असो की स्वतंत्र वसाहतीचा प्रश्न, त्यात त्यांच्या अभ्यासपूर्णतेचा व तर्कशुद्धतेचा अर्थपूर्ण भाग असतो.''[२] वरील भाष्य खरातांच्या लेखनाची वैशिष्ट्यपूर्णता दिसते. वर्णभेदावर त्यांनी करडे भाष्य केले आहे. यामध्ये विविध भ्रामक कल्पनावर प्रहार केला आहे. यामध्ये विविध लेखक, कार्यकर्ता, विचारवंताच्या कार्याचा वैशिष्ट्यपूर्ण वेध घेतला आहे.

'दलितांचे प्रबोधन' (१९७८) हा ग्रंथ विविध सामाजिक, राजकीय समस्या आणि विषयाच्या अनुषंगाने केलेल्या चिंतनाचा लेखसंग्रह आहे. भारतीय समाजव्यवस्थेला आधुनिक ज्ञानविज्ञान, मूल्ये, कायदा, शिक्षणाद्वारे आणि सत्तेद्वारे ब्रिटिशांनी प्रचंड हादरे दिले. दुसरीकडे दलित, बहुजन अथवा शुद्रातिशूद्र समाजातील म. फुले, वि. रा. शिंदे, वेलंगकर, शि. जा. कांबळे, कि. फा. बनसोडे आणि डॉ. आंबेडकर व विचारवंत आणि समाजक्रांतिकारकांनी ब्राह्मणी व्यवस्थेवर प्रखर हल्ले केले. वरील विचारवंत आणि समाजसुधारकांनी आपल्या विचाराद्वारे व प्रत्यक्ष कृतीद्वारे समाजप्रबोधनाचे कार्य केले. डॉ. गंगाधर पानतावणे यांनी वरील विचारवंत आणि लेखकांच्या योगदानाची मूल्यात्मक चर्चा केली.

'वादळाचे वंशज' (१९८२) या ग्रंथामध्ये 'विद्रोहाचे पाणी पेटले आहे' या ग्रंथाप्रमाणेच दलित चळवळीतील शाहीर, कार्यकर्ते, विचारवंत यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आलेख रेखाटतानाच

त्यांच्या विचारांची मूल्यात्मक चर्चा केली आहे. यामध्ये गोपाळबाबा वलंगकर, के. ना. देव उर्फ पतित पावनदास, तुकाराम अंबादास पुरोहित, शाहीर भीमराव कर्डक, कवी दलितानंद, कवी श्रीधर, शांताबाई दाणी, हरिहरराव सोनुले , वसंत मूल इ. व्यक्तीच्या विषयीची माहिती या ग्रंथामध्ये दिली आहे. त्यांनी अस्पृश्यांच्या स्वतंत्रतेच्या विषयीची जी चळवळ केली जे मौलिक विचार मांडले ते सर्व विचार अत्यंत सूक्ष्म दृष्टीने, अत्यंत प्रामाणिकपणे व आत्मीयतेने मांडले आहेत. यातील पतित पावनदास अस्पृश्यांचे दुःख व्यक्त करताना ते म्हणतात, ''अस्पृश्य याच मातीतील, याच देशातील परंतु त्यांना बहिष्कृताचे जिणे जगावे लागते. अपमान सहन करावा लागतो याची विलक्षण चीड पतितपावनदासांना होती. साऱ्या जगाला अध्यात्म शक्ती संप्रदान करण्याचा दावा करणारा हिंदू समाज आपल्या पायाखालील जाळ मात्र विझवू शकला नाही. हिंदू धर्म महोदार आहे, व्यापक आहे या अशी वल्गना करणाऱ्यांना त्यांनी विचारले -

**''तुम्ही माणसे, आम्ही माणसे हिंदू हिंदू**
**तुम्ही आम्ही**
**ऐसे असोनी धर्म मंदिरी आम्ही आम्ही**
**तुम्ही तुम्ही''[३]**

अशाप्रकारे विषमतेच्या भिंती उभारणाऱ्या लोकांविरुद्ध आवाज उठवलेला आहे. यामध्येच पतित पावनदासांचे वृत्तपत्रीय लेखन आणि त्यांच्या कार्याची केलेली चर्चा पाहण्यासारखी आहे. ''डॉ. कुर्तकोटी, डॉ. मुंजे यांच्यासारख्या दलित नेत्यांच्या धर्मांतर विरोधी विचारांचे कठोर परीक्षण केले. 'स्वधर्मे निधनं श्रेय', 'चोरांची माय गालात रडे', 'लोभी गुरू लालची चेला' यासारख्या अग्रलेखातून प्राधान्याने त्यांनी सामाजिक व धार्मिक प्रश्नांचा खल केला. आपल्या मतांच्या पृष्ठीसाठी ते अनेक संस्कृत वचने व म्हणी उद्धृत करीत. त्यांची लेखणी अनेकदा जहाल रूप धारण करी. अभिनिवेशापेक्षा विचारदर्शनावर त्यांचा अधिक भर असे.''[४] त्याचप्रमाणे शांताबाई दाणीवरील लेख अभ्यासपूर्ण, संशोधनात्मक आणि वाचनीय आहे. यातून शांताबाईचे व्यक्तिचित्र उभे राहते. त्या घराबाहेरच्या जगात आपल्या अस्तित्वासाठी झगडत होत्या. दलित स्त्रीचे भवितव्य घडविण्यासाठी कटिबद्ध झाल्या होत्या. त्यांनी सार्वजनिक क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर त्यांनी काही कविता लिहिल्या. सामाजिक जीवनातील भेदाभेदांची कवयित्रीला मनस्वी चीड होती. एकीकडे धनिकांचा जल्लोष तर दुसरीकडे गरिबांची असाह्यता कवयित्रीला छळते आणि मग अंतरंगातून भावना प्रगटतात -

**'धनिकांच्या सदनात पक्वान्न - पंगती उठती**
**भुकेचा डोंब उदरी, पोरे झोपडीत रडती**
**-- -- -- -- -- --**
**दु:खे अनंत उरी कशी घालावी रांगोळी**
**दैन्य घरात पसरे पेटे अंतरात होळी**
**-- -- -- -- -- --**
**कृष्ण कृत्य करण्याची मुक्त सुभा धनिकास**
**शिकार गरिबांची परि चाले राजरोस**

'प्रबोधनाची दिशा' (१९८४) या ग्रंथामध्ये म. फुले आणि डॉ. आंबेडकरांच्या चळवळीविषयी माहिती सांगितली आहे आणि त्याचबरोबर समकालीन सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्नांचाही मागोवा घेतला आहे. म. फुले यांनी ब्राह्मणी वर्चस्व, धर्म आणि धर्मग्रंथातील भाकड कल्पनावर जी प्रखर टीका केली. त्यामुळे काही ब्राह्मणवाद्यांनी त्यांचा सूड घेण्याचा प्रयत्न केला. काही आरोप केले. त्यामुळे पानतावणे यांनी त्यांचे क्रांतिकारकत्व स्पष्ट करून ते आरोप मोडीत काढण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे या ग्रंथामध्ये मार्क्स-आंबेडकर समन्वयाला विरोध केला आहे. मार्क्सवाद्यांनी आंबेडकर तत्वज्ञानाचा अर्थ एकांगी पद्धतीने लावण्याचा प्रयत्न केला आहे व त्याबद्दल विपर्यासत्मक लेखन केले आहे. त्यांचे युक्तिवादात्मक रीतीने खंडन करण्याचा प्रयत्न डॉ. पानतावणे यांनी केला आहे. भारतीय मार्क्सवाद्यांनी डॉ. आंबेडकरांच्या धर्म आणि धर्मांतरा-विषयी टीका करताना त्याला प्रतिगामी घटना संबोधले आहे. पानतावणे यांना भारतीय मार्क्सवाद्यांची ही भूमिका अंतर्विधग्रस्त वाटते. यामध्ये त्यांनी नारायण देसाईच्या भूमिकेचा प्रतिवाद केला आहे. कॉ. नारायण देसाई यांनी डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराला दलित समाजाचे प्रश्न शास्त्रशुद्ध म्हणजेच मार्क्सवादी पद्धतीने सोडविण्याऐवजी धर्मांतर करून काल्पनिक जीवन जगण्याचा नवा भ्रम निर्माण केला. या टीकेला पानतावणे यांनी बौद्धिक विलास संबोधून केलेले युक्तिवाद लक्षवेधी आहेत. उदा. ''भारतीय कामगारांत एकात्मता आहे ही देसाईंची खात्री आहे की भ्रमाचा भोपळा ? भारतीय कामगार एक आहेत किंवा जगातील सर्व कामगार एक आहेत. हे स्वप्नरंजन तरी आहे किंवा आदर्शवाद तरी आहे. कामगारातील अनेक गट, परस्परविरोधी भावना, हितसंबंध, गटप्राबल्याचे स्तोम या बाबींमुळे आजही सर्व कामगार एक होऊ शकले नाहीत.''[६] अशा प्रकारचा युक्तीवाद पानतावणे यांनी केला आहे.

'चैत्य' (१९९०) या ग्रंथामध्ये डॉ. पानतावणे यांनी विविध प्रकारच्या ग्रंथांना वैशिष्ट्यपूर्ण अशा प्रस्तावना लिहिल्या आहेत. त्याचा संग्रह केला आहे. यामध्ये रा. ठ. इंगळे यांच्या 'महारांचा सांस्कृतिक विकास', डॉ. पी. ए. गवळी 'पेशवेकालीन गुलामगिरी व अस्पृश्यता', दीनबंधु शेगावकरांच्या 'त्रिशरण आणि रजनीशांचा उलटा क्रम' या प्रकारच्या वैचारिक व वैशिष्ट्यपूर्ण अशा प्रस्तावना पानतावणे यांनी लिहिल्या आहेत. त्यांच्या विविध प्रस्तावनेमध्ये बौद्ध तत्त्वज्ञान आणि आंबेडकरी तत्त्वज्ञान निर्भिडपणे मांडून आपली प्रामाणिक निष्ठा व्यक्त करतात.

'साहित्य : प्रकृती आणि प्रवृत्ती' हा गंगाधर पानतावणे यांचा वाङ्मयीन समीक्षा ग्रंथ आहे. तसेच या ग्रंथामध्ये त्यांनी वैचारिक भूमिका मांडलेली आहे. यामध्ये ब्राह्मणी आणि अब्राह्मणी यांच्यातील संघर्ष स्पष्ट करतात. यामध्ये ब्राह्मणवादी विचारवंत ब्राह्मणांचे योगदान स्पष्ट करतात. आपला मोठेपणा स्पष्ट करत असता याबद्दल ते म्हणतात, ''निदान विचारांच्या क्षेत्रात साडेतीन टक्क्यांची मराठी संस्कृती म्हणजे हास्यास्पद ठरेल.''[७] तसेच या ग्रंथामध्ये आंबेडकर माटे यांच्या संघर्षावर त्यांनी प्रकाश टाकलेला आहे.

अशाप्रकारे गंगाधर पानतावणे यांनी वैचारिक लेखन केले आहे. यामध्ये वस्तुनिष्ठता, साक्षरता, अभिनिवेशरहितता, साक्षेपीपणा, चिकित्सकता हे त्यांच्या लेखनाचे महत्त्वाचे विशेष आहेत. वैचारिक लेखनासाठी आवश्यक असणारी स्पष्टार्थ व्यक्त करणारी तर्कशुद्ध भाषाशैली त्यांना अवगत आहे. त्यामुळे त्यांचे लेखन समतोल, मनाग्रही, परखड, स्पष्ट आणि लक्षवेधी ठरले आहे.

गंगाधर पानतावणे हे संपादक लेखक समीक्षक अशा विविध अनेक अंगांनी महाराष्ट्राला परिचित आहेत. तरीसुद्धा ते कविप्रकृतीचे आहेत. पूर्वी छंद, सुषमा, वीणा, प्रतिष्ठान, युगवाणी, मनोहर इ. अंकांतून त्यांच्या कविता प्रकाशित होत असत. आज ते कविता लिहित नसले तरी त्यांच्यातील ही कविप्रवृत्तती ठाई ठाई प्रकट होत असते. '' 'नाठाळाचे माथा काठी' घालत असताना ते काहीसे कठोर वाटत असले तरी त्यांचा स्वभाव स्नेहल, संवेदनशील इतरांची मतन जपणारा आहे. त्यांचे निसर्गप्रेम, संगीत, चित्र, शिल्पाविषयीची त्यांची आस्था पाहिली म्हणजे एका कवीच्या सौंदर्यासक्त मनाची ओळख पटते. त्यांचे पेपर रिडिंग असो व देखणं अक्षर; या सगळ्यांना सहज एक लय लाभलेली असते. 'मूकनायक' हे त्यांचे पुस्तक भाषा लालित्याचा एक उत्कृष्ट नमुना ठरावा असाच आहे. समेवर यावं तसं या पुस्तकातील परिच्छेद एका उत्कट बिंदूवर येऊन थांबतात. सुखद-सुखद विरामानंतर लेखन पुढील आशयापुंजाला साकार करण्यासाठी पुढे पुढे लयीत सरकत राहतं.''[८]

गंगाधर पानतावणे यांनी 'साता समुद्रा पलिकडे', 'तोकानोमा', 'डोह' सारखं सुंदर शब्दशिल्प तयार केले आहे. त्यांनी वैचारिक लेखन तर केले आहेच. त्याचबरोबरच त्यांनी लालित्यमय लेखन ही मोठ्या प्रमाणात केले आहे.

## 'अस्मितादर्श'कार गंगाधर पानतावणे

१९६८ मध्ये 'अस्मितादर्श' या नियतकालिकाची स्थापना झाली. यामध्ये वाङ्मयीन दलित साहित्य निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण काम अस्मितादर्शने केले. अस्मितादर्श हे नियतकालिक एवढे नावारूपाला येईल असे कोणालाच वाटले नव्हते. परंतु गंगाधर पानतावणे यांसारखे चिकाटीचा आणि तळमळीचा संपादक लाभल्यामुळे अस्मितादर्शचे संगोपन व संवर्धन झाले.

लक्ष्मी कॉलनीतील गंगाधर पानतावणे यांच्या अस्मितादर्शचे कार्यालय आहे. कार्यालय असले तरी घरासारखेच आहे. लेखकांची उठबस, कार्यकर्त्यांची उठबस चालू असली तरी त्यांची पत्नी डॉ. प्रभावती पानतावणे या व्यवसायाने डॉक्टर असल्या तरी रोजच्या घाईगडबडीत एखाद्या नवीन माणसाचे स्वागत व विचारपूस वेगळ्याच आपुलकीने केली जात होती. गंगाधर पानतावणे यांचे सगळ्यात मोठे योगदान म्हणजे त्यांनी अनेक लेखक घडविले. त्यांनी अनेक सुशिक्षित तरुणतरुणींना लिहिते केले. अनेक पुस्तकांना त्यांनी प्रस्तावना लिहिल्या. नवलेखकांना यांनी हिताच्या गोष्टी सांगितल्या. त्यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. 'अस्मितादर्श' हे नियतकालिक म्हणजे नवलेखकांना प्रशिक्षण देणारी कार्यशाळाच होय.

'अस्मितादर्श' सुरू झाले त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने जागृत झालेला दलित समाज आधुनिक विद्येने चैतन्यमय झाला होता. नवशिक्षित दलित तरुणांची पिढी बाहेर पडली होती. मानहानीचे जीवन जगत असलेला समाज ताठ मानेने जीवन जगण्याचा प्रयत्न करत होता. काही नियतकालिकातून दलित समाजाचं दु:ख बाहेर पडत होत परंतु, खरोखर जे दाहक जीवन जगत होते. ते मात्र साहित्यातून दिसून येत नव्हतं. दलित समाज जे जीवन जगत होते ते जीवन समाजापुढे मांडण्यासाठी तरुण लेखक घुसमटत होते. त्याचवेळी आस्मितादर्श नियतकालिकांचा जन्म झाला आणि पुढे हे सर्व दु:ख अस्मितादर्शच्या रूपाने बाहेर पडले.

या नियतकालिकानं अक्षरश: अनेक लेखकांना प्रकाशाची व सन्मानाची वाट दाखवली. आज कित्येक प्रसिद्धीस आलेल्या नामवंत लेखकांचा पहिलावहिला हुंकार प्रकट झाला तो अस्मितादर्शमध्ये ! कथेच्या क्षेत्रात योगीराज वाघमारे, सुखराम हिरवाहे, रविचंद्र हडसनकर ही नाव

चटकन डोळ्यापुढं येतात. काही नवीन लेखकाबरोबरच जुन्या लेखकांनीही अस्मितादर्शमधून आपले कथासाहित्य प्रसिद्ध केले आहे. यामध्ये शंकरराव खरात, बाबुराव बागुल, केशव मेश्राम इत्यादी प्रसिद्ध लेखकांचे कथा साहित्य प्रसिद्ध झाले. गंगाधर पानतावणे यांनी खरोखर अनेक नवसाहित्यिकांना जेव्हा प्रोत्साहनाची गरज होती तेव्हा स्वत: त्यांना पत्र लिहून लिहिण्यास प्रवृत्त केले. काहीजणांना प्रस्तावना लिहायला सांगितल्या. तेव्हा मला जमेल का ? असे म्हटल्यानंतर गंगाधर पानतावणे म्हटले जमेल तसे लिहा मग बघू असे म्हणून कित्येकांना लिहिण्यास प्रवृत्त केले. अस्मितादर्शमुळे अनेक नवकवी उदयाला आले. काही कविता त्यांनी आवर्जुन मागवून घेतल्या व अस्मितादर्शमध्ये छापल्या. त्यामध्ये केशवसुत पारितोषिक मिळवणारे त्र्यंबक सपकाळे यांच्या कवितेला अस्मितादर्शनेच प्रथम स्थान दिले. त्यांचा 'सुरुंग' हा काव्यसंग्रह अभ्यासक्रमात समाविष्ठ झाला आहे. त्यांनी दलित अनुभव आपल्या कवितेत व्यक्त केला पण त्याच बरोबर त्यांनी जीवनवादी व चिंतनशील अशा कविता ही लिहिल्या आहेत.

१९६८ साली सुरू केलेले अस्मितादर्श जिद्दीने व चिकाटीने आजच्या घडीपर्यंत जिवंत ठेवले आहे. गंगाधर पानतावणे यांचे हे कार्य दलित साहित्यालाच नव्हे तर एकूण मराठी वाङ्मयाला कधीच विसरता येणार नाही. 'साहित्य समाज आणि संस्कृती' या त्यांच्यावरील गौरवग्रंथामध्ये भ. मा. परासावळे यांनी अस्मितादर्श या नियतकालिकामुळे झालेले परिणाम हे अस्मितादर्शचे विविध मेळावे जे घेतले गेले आहेत, त्याचे परिणाम आहेत. हे सर्व अस्मितादर्शला ३७ वर्षे पूर्ण झाल्यानंतर दिसून आलेले परिणाम आहेत. ते पुढीलप्रमाणे -

१. बाबासाहेबांनी सुरू केलेली मूर्तीभंजनाची प्रक्रिया अस्मितादर्शने वाङ्मयीन पातळीवर पुढे चालू ठेवली.

२. बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान चिकित्सक लेखाद्वारे लोकांपर्यंत पोहचवले.

३. बाबासाहेबांनी केलेल्या क्रांतीला अधिक गतिमान करण्याचा प्रयत्न केला.

४. दलित साहित्यिकांना बंडखोर होण्याची प्रेरणा दिली.

५. आंबेडकरी साहित्यप्रवाह निर्माण करण्याचे बळ दिले.

६. निखळ रंजनवादी साहित्याला शह दिला.

७. क्रांतिगर्भ साहित्याची सतत चर्चा घडवून आणली.

८. 'मराठवाडा अंकातील दलित साहित्याविषयी चर्चा अस्मितादर्शच्या सातत्याने लाऊड' होत जाणाऱ्या आवाजाचा परिणाम होता.

९. अभ्यासक्रमात दलित साहित्याचा अंतर्भाव होऊ लागला.

१०. समीक्षाविचार व तिचे मापदंड हलकेच नवे वळण देऊ लागले.

११. साचेबद्ध स्थितीशील वाङ्मयीन अभिरूचीत बदल होऊ लागला.

१२. रूढ प्रमाणकांवर हल्ले सुरू झाल्यामुळे वेगवेगळ्या सौंदर्यशास्त्राचे अन्वेषण सुरू झाले.

१३. प्रमाण भाषेचा धाक व अडसर दूर सरला.

१४. दलित साहित्याला साहित्य म्हणून प्रतिष्ठा प्राप्त झाली.

१५. दलित मनातील अस्मितेचे भान धगधगत ठेवले.

१६. मानवी स्वातंत्र्य व मानवी प्रतिष्ठेचे महत्त्व जनमानसात रूजवले.

१७. जीवनाभिमुखता वाढीस लावली.

१८. अंधश्रद्धेला तडा गेला.

१९. सम्यक जीवनदृष्टीचे बीजारोपण केले.

२०. दलित साहित्य चळवळीला सामर्थ्य दिले.

२१. अस्मितादर्श वाङ्मय पुरस्कारामुळे नव्या लेखकांना प्रोत्साहन मिळाले.

२२. प्रस्थापित वाङ्मयीन व्यासपीठांना दलित साहित्याची दखल घेणे भाग पडले.

२३. देशातील अन्य भाषिक प्रांतात दलित साहित्याचा विचार होऊ लागला.

२४. देशाबाहेरील अभ्यासक, संशोधक या विषयाकडे आकृष्ट होऊ लागले.

२५. दलित साहित्य मराठी वाङ्मयाची समृद्धी वाढवणारे दालन ठरले.''[१०]

खरोखर गंगाधर पानतावणे यांनी अस्मितादर्शच्याद्वारे विविध लेखकांना नवलेखकांना जे तयार केले आहे व त्याद्वारे जे विविध मेळावे घेतले त्याचा फार मोठा परिणाम आपणाला दिसून येतो.

त्याचबरोबर या लेखात त्यांनी म्हटले आहे की, ''अस्मितादर्श हे आंबेडकरवादाचे अपत्य असून serve, speak and fight ही त्रिसूत्री अस्मितादर्शने स्वीकारली आहे. तसेच आंबेडकरवाद हीच दलित साहित्याची प्रेरणा असून हीच अस्मितादर्शची प्रतिष्ठा आणि जीवनदृष्टी आहे, असे ते निक्षून सांगतात. दलित ही संकल्पना अधिक स्पष्ट करताना ते म्हणतात, ज्यांचे मनुष्यात्व नाकारले गेले, ज्याची समाज प्रतिष्ठा या देशात शून्य होती, असा माणूसच केवळ दलित या संज्ञेस पात्र ठरतो. अर्थात आर्थिकदृष्ट्या शोषित असलेला श्रमजीवी वर्ग दलित ठरू शकत नाही हे ओघाने स्पष्ट होते. नियतीवर विसंबून करूणा भाकणारा व मृत्युत्तर मुक्तीची खोटी कास धरणारा, परंपरा-शरण दलितही त्यांच्या संकल्पनेत बसणारा दिसत नाही.''[११]

असे परखड भाष्य करणारे गंगाधर पानतावणे कठोर वाटतात. कधी कधी त्यांच्या बोलण्यामध्ये तथ्य वाटते. उदा. ''दलितेतर मग तो कितीही नवनवोन्मेषशालिनी प्रतिभेचा व प्रज्ञेचा असला तरी त्याची दलित जीवनाची मांडणी कल्पनेच्या आणि सहानुभूतीच्या क्षेत्रातीलच असेल प्रत्यक्ष अनुभूतीचा स्पर्श त्याला नसेल.'' गंगाधर पानतावणे अदलितांच्या दलित अभिव्यक्तीविषयी पुढे म्हणतात, ''असे उपरे साहित्य मनुष्यत्व हिरावून घेतलेल्या माणसाच्या दुःखाला गोंजारते.''

कोणत्याही प्रकारची साहित्य चळवळ ही केवळ लेखकांची असत नाही. तिच्यात वाचक जाणीवपूर्वक सहभागी झाले तरच तिला परिपूर्णता येऊ शकते. हे गंगाधर पानतावणे यांनी ओळखले होते. म्हणूनच अस्मितादर्श प्रकाशित करून थांबले नाहीत तर महाराष्ट्राच्या विविध भागात त्यांनी 'अस्मितादर्श' चे लेखक वाचक मेळावेही घेतले. हे मेळावे म्हणजे साहित्य संमेलनच असतात. परिसंवाद, निबंध वाचन, चर्चासत्रे, काव्यवाचन अशा अनेक उपक्रमांनी गजबजलेले हे मेळावे नवीन संवेदनशीलता निर्माण करणारे ठरले. यावरूनच अस्मितादर्शबद्दल व त्यातील प्रकाशित लेखनाबद्दल डॉ. पानतावणे यांची जागरूक व व्यापक दृष्टी आपल्या लक्षात येते.

## गंगाधर पानतावणे यांचे वाङ्मयीन विचार

साहित्याची ताकद काय आहे, केवढी असू शकते यासंबंधीचे मूलगामी विवेचन गंगाधर पानतावणे यांनी अनेकवेळा केले आहे. अनेक वेगवेगळ्या साहित्याची निर्मिती केली आहे. समाज, शिक्षण, साहित्य आणि संस्कृती या परिघात त्यांचे चिंतन व्यापलेले आहे. गंगाधर पानतावणे यांचे चिंतनशील व्यक्तिमत्त्व आहे. त्यांची वेगळ्या प्रकारची जी ग्रंथनिर्मिती आहे, ती संशोधनात्मक स्वरूपाची आहे. त्यांच्या अस्मितादर्शमधील विचारनिष्ठ संपादकीय लेखनाचा जरी अभ्यास केला तरी नव्या वाङ्मयीन, वैचारिक, राजकीय, सामाजिक अशा निरनिराळ्या बाजूंनी संशोधन करता येईल एवढे लेखन आपल्याला सापडेल. त्यांनी वेगवेगळ्या विषयांवर लेखन केले आहे. त्यांच्या चिंतनात सूत्र आणि स्पष्टीकरणास अधिक मोकळ्या जागाही असतात. ही सारगर्भता गंगाधर पानतावणे यांनी कसोशीने पाळली आहे. म्हणूनच डॉ. उषा मा. देशमुख त्यांच्याविषयी म्हणतात की, ''डॉ. गंगाधर पानतावणे 'अस्मितादर्श' या मासिकाचे संस्थापक, संपादक आहेत. हे मासिक गेली सत्तावीस वर्षे ते एकटकी आणि एकहाती संपादित करीत आहेत. महाराष्ट्रात वाङ्मयीन मासिकांच्या संपादकांची एक थोर परंपरा आहे. डॉ. पानतावणे हे त्यापैकी एक आहेत. दलित साहित्याच्या निर्मितीपासूनचे ते त्या साहित्याचे साक्षी लेखक आणि पाठीराखे आहेत. पण त्यांच्यात

उथळ अभिनिवेश नाही. समाज, शिक्षण, साहित्य आणि संस्कृती या परिघात त्यांचे चिंतन व्यापले आहे. ते एक ज्येष्ठ विचारवंत आणि मराठीचे प्राध्यापक आहेत. वरील विषयावर हिंदी, मराठी, इंग्रजी भाषेतून त्यांनी विपुल लेखन केले आहे. डॉ. पानतावणे यांचे वैचारिक आणि संशोधनात्मक लेखनही विपुल प्रमाणात आहे. पानतावणे यांचे संस्थात्मक कार्यही लक्षणीय आहे. महाराष्ट्र राज्याच्या जवळ जवळ सर्व समित्यांवर ज्येष्ठ सभासद म्हणून त्यांनी कार्य केलेले असून आपल्या अनुभवाचे योगदान दिलेले आहे. महाराष्ट्र राज्य संतपीठ, वाङ्मयकोश समिती, साहित्य संस्कृती मंडळ, नवलेखक अनुदान समिती, राज्यग्रंथ निवड समिती या त्यापैकी काही आहेत.''[१२]

गंगाधर पानतावणे यांनी अनेक लेखकांना योग्य ती दिशा दाखवली आहे. त्यांच्या गती-प्रगतीच्या आत्मशोधाच्या वाटा आपणाला त्यांची समीक्षा प्रस्तावना अभ्यासल्या म्हणजे चटकन लक्षात येतात. गंगाधार पानतावणे यांच्या विवेचनात भीडभाडाची भूमिका कधीही राहिली नाही. कुठल्याही ललितकृतीवर प्रकाश टाकताना, ग्रंथांना प्रस्तावना लिहिताना, मंथन करताना आपला समतोल ढळू न देता सडेतोड व न्यायमूलक भूमिका त्यांनी स्वीकारलेली आहे. त्यासोबतच सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक पातळीवर जाऊन निरनिराळ्या संदर्भाची ते नोंदणी करतात. कोणत्याही कलाकृतीचे मूल्यमापन करताना एखादा लेखक, एखादी कलाकृती ही त्या लेखकांपुरती त्या कलाकृतीपुरतीच दर्जेदार असते असे नाही. त्या सोबतच, लेखकांची पार्श्वभूमी, इतिहास, मानसिकता, प्रचलित व्यवस्था, प्रदेश, भाषा, जीवन याही बाबी तिथे महत्त्वाच्या ठरतात. त्या सर्व बाजू पाहिल्याशिवाय त्या लेखकांचे व त्या कलाकृतीचे मूल्यमापन पूर्ण होत नाही. याकडे त्यांचे लक्ष असते.

मराठी दलित वाङ्मयामध्ये गंगाधर पानतावणे यांनी फार व्यापक भूमिका मांडली आहे. अस्मितादर्श समीक्षालेखन, वैचारिक लेखन, महाराष्ट्रातील विद्यापीठामधून दिलेली व्याख्याने, ग्रंथाच्या प्रस्तावना, व्याख्यानमाला, साहित्य संमेलन अशा प्रकारच्या विचारप्रबळ व विचारप्रवणाद्वारे पानतावणे यांनी अव्याहतपणे आपली बुद्धिनिष्ठ भूमिका मांडली आहे. एक महत्त्वाची बाब म्हणजे आंबेडकरी विचार, साहित्य, समाज आणि संस्कृती, दलित साहित्याची त्रिसूत्री, आजची मराठी समीक्षा, दलित आणि ग्रामीण वाङ्मय, वाङ्मयेतिहास पुनर्लेखन, संत साहित्य, संशोधनपर साहित्य अशा विविध घटकांची लक्षवेधी चर्चा त्यांनी केली आहे.

आंबेडकरवादी दलित साहित्याने मराठी वाङ्मय व मराठी जीवनसंस्कृती या जगताला कार्य दिले यासंबंधी गंगाधर पानतावणे यांनी दशसूत्री दिली ती खरोखरच विचार करण्यासारखी आहे. ती दशसूत्री पुढीलप्रमाणे -

१. दलित साहित्याने पुराण मानसिकता बदलली.

२. प्रस्थापित, साहित्यसमाज, मनुवादी धर्म, शोषण, दास्य, अंधश्रद्धा नाकारली, इहवाद स्वीकारला.

३. इतिहासाचा अन्वय लावून इतिहासाकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली.

४. नवी 'आयडेन्टिटी' दिली. आधुनिकता हे मूल्य दिले.

५. वाङ्मयीन अभिरूची बदलण्याचे महनीय कार्य केले.

६. पारंपारिक साहित्य समीक्षेला आव्हान दिले.

७. साहित्याची सामाजिकता (Sociology of Literature) या संकल्पनेला पायाभूतता दिली.

८. देशी साहित्याला बळकट आधार दिला.

९. आंबेडकरी तत्त्वज्ञान साहित्यसर्जनाला प्रेरक ठरू शकते ह्याची प्रचिती दिली.

गंगाधर पानतावणे यांची दशसूत्री म्हणजे संपूर्ण दलित साहित्य. साहित्यामागची असलेली चळवळ. या चळवळीच्या मुळाशी असलेली सशक्त आंबेडकरी विचार परंपरा यामधूनच फुलत गेलेल्या दलित लेखनाचा मुख्य घटक आहे. गंगाधर पानतावणे यांचे वाङ्मयीन विचार खरोखरच खूप प्रभावशाली आहेत. साहित्य नुसते साहित्य कधीच नसते. त्याला एक विशाल पार्श्वभूमी असते. त्याला एक इतिहास असतो. साहित्याचे एक मानसशास्त्र असते. दलित वाङ्मयाला तर जाणिवांची एक मोठी पार्श्वभूमी आहे हेही आपल्याला पानतावणे यांचे दशसूत्रीमधून जाणवते.

गंगाधर पानतावणे यांनी खूप वेगवेगळ्या प्रकारे आपले वाङ्मयीन विचार स्पष्ट केले आहेत. हे वाङ्मयीन विचार स्पष्ट करत असताना त्यांनी स्पष्ट, ठाम, संदर्भपूर्ण आणि साधार असे विवेचन केले आहे. संतवाङ्मय, लोकसाहित्य, बालवाङ्मय, पत्रकारिता, समीक्षा, सर्व ललित साहित्य, सौंदर्यशास्त्र, संगीत, वैचारिक वाङ्मय, शाहिरी परंपरा, प्रबोधनपर लेख आणि स्तंभलेखन अशा वेगवेगळ्या लेखन प्रकाराद्वारे आपले वाङ्मयीन विचार स्पष्ट करताना दिसतात.

गंगाधर पानतावणे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल नेहमीच कृतज्ञता व्यक्त केली आहे. त्यांच्या चिरंतन मूल्यांचा त्यांनी आपल्या वाणीद्वारे व लेखणीद्वारे गौरव केला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रांवर त्यांनी प्रबंध सादर केला आहे. तेही कोणत्याही मार्गदर्शकाशिवाय, हे त्यांचे वैशिष्ट्यच म्हणावे लागेल. त्यांनी नेहमीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दलित वाङ्मयीन चळवळ याविषयी प्रभावी असे लेखन केले आहे व ती सर्व चळवळ त्यांनी अस्मितादर्श या नियतकालिकातून अजूनही चालू ठेवली आहे.

डॉ. बाबासाहेबांच्या जीवनविचाराचा गाभा पानतावणे यांनी जोपासला आहे. म्हणूनच ते म्हणतात, ''साहित्य चळवळ विविध प्रश्न निर्माण करते आणि त्याची उत्तरेही देते. दलित साहित्याच्या चळवळीच्या बाबतीत हे घडले आहे. निर्मिती आणि समीक्षा ही कोणत्याही चळवळीचे आधार होत अर्थात सकस निर्मिती आणि पूर्वग्रहरहित व सत्यान्वेषी समीक्षा हीच येथे अपेक्षित आहे. दलित साहित्य चळवळीला या दोघांचेही भान सतत राखायचे आहे.''[१३] तसेच ते पुढे म्हणतात, ''दलित साहित्याची पार्श्वभूमी सामाजिक व सांस्कृतिक चळवळ आहे म्हणून बंधमुक्ततेच्या चळवळीतून निर्माण झालेल्या दलित साहित्याच्या जन्मखुणा पुसणे अनैतिहासिक व गैर ठरेल. कोणतेही साहित्य मागिलांचा हात धरून पुढे रांगायला लागते. नंतर मात्र केव्हातरी ते स्वबलावर उभे राहते. हे अपरिवर्तनीय सत्य आहे.''[१४]

अशाप्रकारे गंगाधर पानतावणे यांनी वेगवेगळ्या लेखनप्रकाराद्वारे आपले वाङ्मयीन विचार प्रकट केले आहे. पण हे विचार लेखन मार्गदर्शक स्वरूपाचे आहेत. मग ते कोणत्याही साहित्य प्रकाराविषयी असो. त्या विषयीचे सखोल ज्ञान मिळवून त्यांनी हे विचार व लेखन प्रकट केले आहे. बाबासाहेब आंबेडकरांच्या बद्दल विचार प्रकट करत असताना त्यांनी म्हटले आहे, ''विसाव्या शतकात बाबासाहेब यांचे झुंजार व झंझावती नेतृत्व आलं आणि आम्ही मानसिक क्रांतीला सिद्ध झालो. आम्ही स्वत:ला चाचपडू लागलो. आत्मशोध घेऊ लागलो. एक आत्मविश्वास जागा झाला. आम्ही युद्धसन्मुख झालो. आम्हाला नव्या जीवनाची भाषा कळली. हक्काचा अर्थ कळला. बाबासाहेब जन्माला आले नसते तर आम्हाला स्वाभिमानाचा निळा झेंडा कुणी दिला असता ? बाबासाहेब जन्माला आले नसते तर कुणी ज्ञानाची मशाल पेटवली असती ? कुणी आमच्या मनावरची लाचारीची, अगतिकतेची आणि गुलामगिरीची काजळी पुसून काढली असती ? बाबासाहेब नसते तर कधी आमच्या दिशा आणि वाटांना कुणी आकार दिला असता ? प्रज्ञा, करुणा आणि मैत्रीचा अन्वयार्थ कुणी सांगितला असता ? बाबासाहेब म्हणजे एक धगधगता निखारा. बाबासाहेब म्हणजे एक अमर्याद शक्ती. बाबासाहेब आमचा श्वास, विश्वास आणि

ध्यास. बाबासाहेब हे जीवंत वर्तमान होत आणि आशावादी भविष्य होत. बाबासाहेब आमच्या जीवनग्रंथाचे महान नायक होते. बाबासाहेब हे आमच्या जीवनसृष्टीचे रचनाकार होते.''[१५]

''साहित्याचे उत्कृष्ट आणि निकृष्ट साहित्य असे दोन प्रकार अस्तित्वात असतात आणि वाङ्मयीन गुणवत्ता हाच साहित्यकृतीचा खरा निकष असतो.'' हे गंगाधर पानतावणे यांचे मत साहित्यविषयक भूमिका स्पष्ट करते. दलित लोकवाङ्मय हे उपेक्षित अभ्यासक्षेत्र असून अभ्यासकांनी या क्षेत्रामध्ये अभ्यास करण्याचे आव्हान स्वीकारले पाहिजे. अशाप्रकारे त्यांनी वेगवेगळ्या निमित्ताने आपले वाङ्मयीन विचार प्रकट केले आहेत. ते सतत ज्ञानसाधना, अभ्यास व चिंतन करत असतात. जिज्ञासा, सातत्य, वाचनाची शिस्त, परिश्रमाचा परमोत्कर्ष यामुळेच त्यांचे वाङ्मयीन विचार एवढे प्रगल्भ आहेत हे आपणास दिसून येतात. त्यामुळेच ते कोणत्याही विषयाची विस्तृत, सम्यक आणि सूक्ष्म मांडणी करणे, कोणताही विषय तर्कशुद्ध पद्धतीने सर्व बाजुंनी समप्रमाणात मांडणे, कधी कधी प्रतिपक्षाचे म्हणणे वस्तुनिष्ठ पद्धतीने मांडत त्यावर टीका-टिप्पणी करीत खंडन मंडणात्मक पद्धतीने पुराव्यासह स्वमत हिरीरीने प्रतिपादन करणे या सर्व गोष्टी इतक्या सहज व स्वाभाविकपणे मांडत. त्यामुळेच त्यांची व्याख्याने ही श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून टाकत. एकूणच गंगाधर पानतावणे यांचा वाङ्मयीन विचारांचा घाटच सर्वोत्कृष्ट असा आहे.

अस्मितादर्श या नियतकालिकानं ललित साहित्याची त्याचप्रमाणे साहित्य, कला, शिक्षण, धर्म, इतिहास असं अनेक प्रकारचे वैचारिक धन मराठी वाचकांना दिले. अस्मितादर्शमधून अनेक थोरामोठ्यांनी विचारवंतांनी समीक्षकांनी आपले विचार मांडलेले आहेत. यामध्ये दि. के. बेडेकर, प्रभाकर मांडे, शरच्चंद्र मुक्तिबोध, वा. ल. कुलकर्णी, प्राचार्य नरहर कुरुंदकर, ग. वि. केतकर, प्रभाकर पाध्ये, श्री. के. क्षीरसागर इ. लोकांनी आपले विचार अस्मितादर्श मधून मांडलेले आहेत. अस्मितादर्शच्या वाटचालीचा मागोवा घेताना दलित तरुण लेखक मोठ्या प्रमाणात पुढे आले. दलित साहित्याच्या चळवळीत विचारानं आणि मनानं एकरूप झालेला दलितेतर लेखकांचा मोठा वाचकवर्ग या नियतकालिकानं आपलासा केला आहे.

''गंगाधर पानतावणे यांनी अस्मितादर्श एकट्यानं चालवलं आहे. म्हणजेच वर्गणीदार मिळवणं, लेखन मिळवण, त्याच संपादन करण, मुद्रित तपासण, पानांची मांडणी करण, इतकंच काय अंकावर नाव, पत्ता घालून ते पोस्टाच्या पेटीत टाकणे अशी सगळी कामं प्रा. पानतावणे करत आले आहेत. वर्षानुवर्षे संपादकापासून शिपायापर्यंतची सर्व कामे इतक्या चिकाटीने करत राहिल्याचे

यापूर्वी घडलेले उदाहरण म्हणजे 'समाजस्वास्थ'कार र. धों. कर्वे !" खरोखरच दलित साहित्य चळवळ उभी करण्याचे आणि या चळवळीला प्रमाणबद्ध दिशा व वळण देण्याचे कार्य त्यांनी 'अस्मितादर्श' या नियतकालिकातून केले आहे. दलित साहित्यिकांची एक पिढीच्या पिढीच या नियतकालिकाने घडविली आहे व ही पिढी घडवण्याचे काम डोळसपणाने केले आहे. सर्व वैचारिक बैठक असलेल्या गंगाधर पानतावणे यांच्यासारख्या 'पारखी' संपादक 'अस्मितादर्श'ला लाभल्यामुळे झाले. अस्मितादर्श गंगाधर पानतावणे यांनी कष्टाने, कटाक्षाने स्वत:च्या खिशाला कात्री लावून अस्मितादर्श जगवले, वाढवले. पानतावणे यांचा व्यासंग आणि गुणग्राहक वृत्तीमुळे 'अस्मितादर्श'ला सकस नि दर्जेदार साहित्य देता आले.

## गंगाधर पानतावणे यांची लेखन शैली / वाणी

जी माणसे अखंडपणे लेखन करीत असताना या समाजाशी आपली काही बांधिलकी आहे. या भावनेने काही कार्य करीत असतात. त्याचे स्मरण समाजालाही असते. असेच लेखन गंगाधर पानतावणे यांनी अखंडपणे केले आहे. गंगाधर पानतावणे यांनी वेगवेगळ्या प्रकारचे लेखन केले आहे. पण त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी आपल्या तत्त्वनिष्ठेला कडवट असहिष्णुतेचे टोक मात्र प्राप्त होऊ दिले नाही. विविध प्रकारच्या विचारांच्या क्षेत्रातील मतभिन्नता मान्य करतात. समाजजीवनातील विविध विचारांचे अस्तित्व ते मान्य करतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विलोभनीय विशेष म्हणजे आपल्या विचारांपेक्षा भिन्न विचार ही असू शकतात हे मानणारी सहिष्णूता आणि अशा विचारांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतात. गंगाधर पानतावणे यांचा साहित्यविचार हा त्यांच्या जीवनविचाराचाच एक अविभाज्य भाग आहे असे ते मानतात. साहित्यिकांची सामाजिक बांधिलकी ते मान्य करतात. समाजपरिवर्तन हे साहित्याचे उद्दिष्ट आहे. गंगाधर पानतावणे साहित्याला समाज परिवर्तनाच्या लढाईतील एक प्रभावी शस्त्र मानतात.

गंगाधर पानतावणे हे मूळचे कवी. त्यांनी वाङ्मयीन क्षेत्रात काव्यलेखनाने प्रारंभ केला. नागपूर येथील महाविद्यालयात विद्यार्थीदशेपासूनच लेखनास सुरूवात केली. नंतर त्यांनी महाराष्ट्रातील वाङ्मयीन नियतकालिकात त्यांच्या कविता प्रकाशित होऊ लागल्या. प्रसिद्ध साहित्यिक आणि नागपूर तरुण भारतचे ख्यातनाम संपादक कै. श. त्र्यं. माडखोलकर आणि डॉ. वि. भि. कोलते यांचे आपल्यावर संस्कार झाल्याचे नेहमी सांगतात. औरंगाबादमध्ये नागसेवनाच्या परिसरातील डॉ.बाबसाहेबांनी स्थापन केलेल्या महाविद्यालयात त्यांनी अध्यापन केले. त्यावेळी त्यांना म. भि.

चिटणीस, डॉ. वानखेडे यांचा सहवास लाभला. कविमनाच्या पानतावणे यांच्या ठिकाणी आधीपासूनच असलेली सामाजिक दृष्टिकार्यप्रवण झाली आणि त्यांनी काव्यलेखनाबरोबरच वैचारिक लेखनही सुरू केले.

भारतामध्ये विसाव्या शतकात परिवर्तनाची प्रक्रिया फार मोठ्या प्रमाणात गतिमान झाली. याच शतकात लोकशाही प्रस्थापित झाली. देशात शतकानुशतके चालत आलेली सामाजिक विषमता म्हणजे अस्पृश्यता पाहणे हे कायद्याने गुन्हा मानण्यात आले. स्त्रियांना समान हक्क मिळाले. समताधिष्ठित समाजवादी समाजरचना निर्माण करण्याच्या दृष्टीने विचारांचे वारे वाहू लागले. या सर्व परिवर्तनाच्या काळामध्ये वाङ्मयीन कार्य हे वाङ्मयीन न राहता सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि वाङ्मयीन या सर्वांनी एकत्र येऊन कार्य केले. त्यामुळेच वाङ्मयाला सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीने अर्थपुर्णता येऊ लागली. हे सर्व गंगाधर पानतावणे यांनी सर्वरूपाने जाणले. त्यांनी सहकार्यांच्या साहाय्याने 'अस्मितादर्श' हे व्यासपीठ सुरू केले. दलितासंबंधीच्या लेखनाला त्रैमासिकाच्या रूपाने एक नवे व्यासपीठ मिळाले. यातून गंगाधर पानतावणे यांनी अनेक लेख कवींना लिहिते केले. त्यांनी स्वबळावर योग्य अशी दिशा व भूमिका घेऊन नियतकालिकांचा दर्जा संभाळून अस्मितादर्श हे नियतकालिक अखंडपणे चालू ठेवले आहे.

गंगाधर पानतावणे यांनी आपल्या लेखनशैलीमुळे वाङ्मयीन, सांस्कृतिक कार्यात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांनी आपल्या शैलीदार लेखणीमुळे समाजामध्ये जनजागृतीचे काम केले आहे. गंगाधर पानतावणे यांनी स्वतंत्रपणे संशोधन करून लिहिलेला 'डॉ. आंबेडकरांची पत्रकारिता' हा ग्रंथ महाराष्ट्रातील काही महत्त्वपूर्ण ग्रंथांपैकी एक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक विचारांवर मोठ्या प्रमाणात लेखन होत आहे. प्रबंध निर्माण होत आहेत. परंतु, ज्या माध्यमातून त्यांनी सामान्यजनांशी संवाद साधला, समाज जागरणाचे कार्य केले, समाजाला प्रेरणा दिली. त्याकडे सर्वांचेच दुर्लक्ष झाले होते. याची माहिती गंगाधर पानतावणे यांनी डॉ. बाबासाहेबांनी सुरू केलेल्या आणि त्यांनी स्वत: लिहिलेल्या विचारप्रवर्तक लेखनाने समाजाच्या मनात स्थान मिळवलेल्या दुर्मिळ नियतकालिकांना मिळवले. त्यातील डॉ. बाबासाहेबांच्या लेखनाचा अभ्यास केला. प्रबंध तयार केला व मराठवाडा विद्यापीठाला सादर करण्यात आला व हा प्रबंध स्विकारून विद्यापीठाने त्यांना पीएच. डी. ही संशोधन पदवी दिली. अशा प्रकारचे संशोधनाचे दुर्मिळ काम अखंडपणे चालू आहे.

गंगाधर पानतावणे यांची भाषाशैली व लेखनशैली एवढी प्रभावी होती की त्यांनी अनेक लोकांना किंवा नवलेखकांना त्यांनी जी पत्रे लिहिली होती त्यांना गंगाधर पानतावणे न भेटाताही त्यांचे व्यक्तिमत्त्व पत्रातून उभं राहत होतं. अशा पत्रातून अनेक लेखकांना आधार दिला होता. गंगाधर पानतावणे यांचे हस्ताक्षर तर अप्रतिम असेच आहे. त्यांच्या हस्ताक्षरांविषयी फ. मु. शिंदे म्हणतात, ''अनेकजण हस्ताक्षरासंबंधी बोलताना मी ऐकलं आहे. रामदासांच्या पाहण्यात सरांचं हस्ताक्षर आलं असत तर त्यांनी बोरूपासून इतर अनेक बाबी सांगितल्या. त्या न सांगता एवढंच लिहिलं असते -

**गंगाधराचे पुरवावे अक्षर**
**गंगाधराचे गिरवावे अक्षर**
**गंगाधराचे मिरवावे अक्षर वेळोवेळी**

काही जाणकार हस्ताक्षरावरून स्वभाव ओळखतात पण गंगाधर पानतावणे यांचे अक्षर तर पहावचं पण स्वभावचं अक्षरांना गिरवत असेल तर गंगाधर पानतावणेंचा स्वभाव किती रेखीव व लयदार आहे हे वरील उदाहरणावरून लक्षात येते.

गंगाधर पानतावणे यांना भेटल्यावर त्यांच्याशी संवाद केल्यावर त्यांच्या लेखनातील, वाणीतील भाषा कधी कधी खूप खुलत, फुलत जाते. उदा.

१. ''आमचे जीवन नेहमीच वणव्यातून वाट चालत गेले आहे म्हणून आमचे जीवन नेहमीच प्रश्नचिन्हांसारखे राहिले आहे.''

२. ''विस्थापितांचे जग सुखासीन कधीच नसते म्हणूनच त्यांचे वाङ्मयीन जग सुखासीन नसते.''

३. ''आमचे जीवन ही एक प्रयोगशाळा आहे.,''

४. ''वणव्याजवळ गेल्याशिवाय दाहकता कशी कळणार ?''

५. ''स्वस्थतेच्या नंदनवनातून बाहेर आल्याशिवाय पुन: एकदा जीवननाट्याचा प्रत्यय कसा येणार ?''

गंगाधर पानतावणे यांच्या लेखणीतून अशा अनेक जागा पहावयास मिळतात. मनाच्या, जाणिवांच्या रूंद जाणिवा ह्या कशाप्रकारच्या आहेत हे आपल्या लक्षात येतात. त्यांची वाणी व लेखनशैली कधी कधी प्रखर वाटली तरी ते एक समाजातील सत्य असते. ते आपला प्रत्येक मुद्दा

ठोस व पटवून सांगतात. अशाच प्रकारच्या मनाच्या मोठेपणासोबतच गंगाधर पानतावणे यांच्या लेखणीतून उमटणारी संवेदनशीलता व त्यांची शैली विलक्षण अशी आहे. उदा. "असहिष्णुता ही बाबही विषासारखी असते." "वाद-विवाद, संवाद असहिष्णु वृत्तीला मान्य नसतात." "आंबेडकरवाद ही एक विचारप्रणाली आहेच पण ती निर्मितीची एक कृतीशीलताही आहे." "आंबेडकरवादी लेखक हा एकाचवेळी निर्माता आणि समीक्षक असतो." "अद्भूतरम्यता हे एक प्रदुषण आहे त्यापासून मुक्त असणे हेच आंबेडकर विचारप्रणालीची वाङ्मय होय." "आमच्या कवितेचे अंतरंग रंजनाशी बांधलेले नाही. ते विचारांशी बांधलेले आहे." "सामाजिक आणि सांस्कृतिक दुःखाचा आकांत म्हणजे जशी आमची कविता, तशीच उदंड आकांक्षा आणि विजिगीषु इच्छाशक्तीचा तो मुक्त आविष्कार आहे." "सत्य हे नेहमीच खोटेपणाचे, साळसूदपणाचे, अहंतेचे मुखवटे ओरबाडत असते." "ज्ञानाच्या क्षेत्रात अभिनिवेश उपयोगाचा नाही. मात्र इतिहासाचा अन्वयार्थ लावायचा आहे."[१६]

अशा प्रकारे गंगाधर पानतावणे यांनी आपल्या लेखणीतून अथवा भाषणातून एक सलग परंतु एकमेकांशी जोडलेला विचार अभ्यासकांपुढे ठेवतात. जो विचार त्यांनी आपल्या समोर मांडलेला आहे तो खरोखरच चिंतनशील व संवेदनशील असाच असतो. त्यांच्या बोलण्यात किंवा लेखणीत कधीच कोणत्याही प्रकारचा गोंधळ नसतो. ते आपले मत स्पष्ट, ठाम व संदर्भपूर्ण असे मांडतात.

त्यांनी अस्मितादर्शद्वारे जे लेखन केले, जे भाषण केले किंवा अस्मितादर्शची जी संमेलने घेतली याद्वारे त्यांनी खरोखरच विद्रोहाचे वादळ उठवले यातूनच त्यांनी अनेक दलित कवी, दलित कथाकार, दलित नाटककार, दलित समीक्षक व संशोधक निर्माण केले.

गंगाधर पानतावणे यांनी फार मोठ्या प्रमाणात काव्य लेखन केले आहे. त्याचबरोबर त्यांनी लोकवाङ्मयविषयक आणि लोककला यावरही लेखन केले आहे. गंगाधर पानतावणे यांनी पहिल्यांदा काव्यलेखन केले आहे. त्यांचे काव्य 'युगवाणी', 'वीणा', 'सुषमा' यातून प्रसिद्ध झाले आहे. त्याचबरोबर 'वसंत', 'रोहिणी' या मासिकातूनही प्रसिद्ध झाले आहे. त्यांचे साहित्य, समाज आणि संस्कृतीवरील लेखन अभ्यासकांना चिंतनशील व समाजाला नवीन दृष्टी देणारे आहे.

गंगाधर पानतावणे यांनी आपल्या विद्रोही कवितेत म्हटले आहे -

**'वेचलीत फुले ज्यांच्यासाठी**
**तेच शेवटी काटे झाले**
**दिला होता ज्यांना पान्हा**
**त्यांच्या ओठी विष आले'**

गंगाधर पानतावणे यांनी अशाप्रकारच्या कवितातून सत्य सांगण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे त्यांनी कविता, कथा, नाट्य, प्रवासवर्णन या वाङ्मयप्रकाराचे लेखनही त्यांनी केले आहे. त्याचबरोबर त्यांनी विचार युगाचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, 'दलित कथा', 'स्त्री आत्मकथन', 'लोकरंग' हेही त्यांचे संपादित ग्रंथ आहेत. तसेच त्यांनी निग्रो कविता आणि दलित कविता यांची जीवधारणा आणि जीवनजाणीव अत्यंत समर्थपणे मांडली आहे. या दोन्ही प्रकारच्या दुर्लक्षित झालेल्या कवितेवर त्यांनी प्रकाश टाकला आहे. निग्रोंचे 'द स्लेव्ह' हे नाटक पानतावणे यांनी 'गुलाम' या नावाने मराठी रूपांतर केले आहे. तसेच त्यांनी गुजराती कवितेचे रूपांतर ही मराठीत केले आहे.

गंगाधर पानतावणे यांनी मराठीचे प्राध्यापक म्हणून रूजू झाल्यानंतर त्यांनी 'हाका' नावाची कविता लिहिली त्यामध्ये -

**'इतका दूर कसा आलो काहीच कसे कळत नाही**
**कितीक भिजल्या रात्रींनाही कसा मुकलो कळत नाही**
**कित्येक वाटा जुळल्या होत्या, कितीक शब्द थांबले होते**
**मनात खोल खोल असून कुठेच काही उरले नव्हते**
**कितीक होते बोलायचे - ओठांवरची थरथर नुसती**
**देणे घेणे कितीक होते पण कुठलीच भाषा जुळली नव्हती**
**जरा वळलो हातापाशी पोरके आभाळ उभे होते**
**विस्कटलेल्या घरट्यापाशी उगाच डोळे टिपीत होते**
**कितीक वळणे कितीक प्रहर काळोखात पाहत राहिलो**
**पथारीला दुमडून सहज प्रकाशाला झेलत राहिलो**
**इतका दूर आलो घेऊन निळे क्षितिज हातावरती**
**विद्रोहाचे गाणे गाता - आले माझ्या ओठांवरती**

यामध्ये खरोखर त्यांच्या जीवनाची सत्यता त्यांच्या काव्यलेखणीतून आपणास दिसून येते.

डॉ. गंगाधर पानतावणे हे बहुश्रुत वक्ते असे डॉ. भगवान ठाकूर यांनी म्हटले आहे. ते खरेच आहे. खूप माणसं विश्वात अभ्यासू असतात. पण त्यांनी अभ्यासलेला एखादा अवघड विषय सोपा करून त्यांना समोरच्या माणसाला सांगता येत नाही. तसेच असेही काही लोक असतात त्यांचे वक्तृत्व फारच चांगले असते परंतु त्या त्या विषयाचे फारसे वाचन, अभ्यास वा चिंतन नसते. असे गुण फारच थोड्या लोकांच्या ठिकाणी असतात. डॉ. गंगाधर पानतावणे यांच्याजवळ हे दोन्ही गुण आहेत. डॉ. गंगाधर पानतावणे यांचे बहुमिती, बहुमुखी व्यक्तिमत्त्व विद्यार्थीदशेपासूनच घडत-वाढत-समृद्ध होत गेलेले दिसते. याचे कारण म्हणजे गंगाधर पानतावणे यांची ज्ञानसाधना, अभ्यास, चिंतन समृद्ध असे आहे. त्यांची ग्रंथसंपदा पाहता त्यांची जिज्ञासा, सातत्य, वाचनाची शिस्त, परिश्रमांचा परमोत्कर्ष हे त्यांच्या संपन्न व्यक्तिमत्त्वाचे गुण आहेत.

डॉ. गंगाधर पानतावणे कुठल्याही विषयावर भाषण देत असोत ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणित, सामाजिक, धार्मिक, साहित्यिक, राजकीय आणि एकूणच सांस्कृतिक चळवळीचे जबाबदार भाष्यकार आहोत याचे सदैव भान त्यांना होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आपण ऋणाईत आहोत, त्यातून उतराई झाले पाहिजे, त्यांच्या वैचारिक भूमिकेला समाजापर्यंत नेऊन पोहचविणे ही नैतिक जबाबदारी आहे. या भूमिकेतूनच त्यांचे प्रत्येक व्याख्यान असते.

आजच्या वाचन संस्कृतीच्या ऱ्हासकाळात गंगाधर पानतावणे यांचे विविध विषयावरील वाचन सतत चालू असते. समकालीन आणि आजच्या तरुण पिढीतीलही अनेक लेखक-कवी-समीक्षक आणि संशोधकांना गंगाधर पानतावणे यांनी बुद्धिप्रामाण्यवादाचे संस्कार दिलेत. अनेक सर्जनशील जिभांना बोलते केले आणि अनेक हातांना लिहिते केले. गंगाधर पानतावणे जेव्हा एखाद्या विषयावर बोलतात किंवा भाष्य, टिप्पणी करतात तेव्हा ते आंबेडकरी सांस्कृतिक जीवनाचा चालता बोलता संस्कृती कोषच वाटतात. गंगाधर पानतावणे यांनी आतापर्यंत चाळीस ते पन्नास प्रकारच्या विविध विषयांवर अनेक ठिकाणी भाषणं केली आहेत. या भाषणातून दलित साहित्य, कथा, कविता, नाटक, कादंबरी, आत्मकथन अशा सर्व वाङ्मय प्रकारावर आणि त्यातील अलक्षित पैलूंवर भाष्य करत त्या साहित्याला व दलित साहित्याच्या सन्मान प्राप्त करून दिला. ग्रंथप्रकाशन, सत्कार, सभा, संमेलन, अधिवेशनाचे उद्‌घाटन, परिसंवादाचा अध्यक्षीय समारोप असे प्रासंगिक व्याख्यान असेल तरी गंगाधर पानतावणे त्याविषयाची तात्विक मांडणी करून त्या प्रासंगिक विषयाला हात घालतात. त्यांची सगळीच भाषणे आशयारूप व कृतीशील होतात. शब्दांना समर्थपणे व

प्रभावीपणे ते श्रोत्यांपर्यंत पोहचवतात. त्यांच्या बोलण्याच्या ओघात नेहमीच नवे संदर्भ, चळवळीतील अज्ञात तपशील, पुस्तकांची, लेखकांची माहिती येत असते.

डॉ. भगवान ठाकूर गंगाधर पानतावणे यांच्याबद्दल म्हणतात की, ''मराठी साहित्यातील विचारप्रधान साहित्याच्या परंपरेला फुले-आंबेडकरवादी तत्त्वज्ञानाच्या दोहनातून डॉ.पानतावणे यांनी खूपच समृद्ध केले आहे. सर्जक, समीक्षक, संशोधक, तरुणाईला त्यांचे एक एक व्याख्यान म्हणजे आदर्श वस्तुपाठ असतो. सर म्हणजे आंबेडकरवादी तरुणाईचे विचारपीठच. त्यांच्या व्याख्यानातून श्रोत्यांची आशयप्रधान वाङ्मयाबद्दलची अभिरूची समृद्ध होते. पुरोगामी वाचन संस्कृती बरोबरच श्रवण संस्कृती घडवण्याचे फार मोठे श्रेय त्यांच्यातील साक्षेपी वक्त्याला आहे. वैयक्तिक पातळीवर टीका-टिप्पणी ते आपल्या भाषणातून टाळतात. परंतु अपप्रवृत्तीचा साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील प्रदुषणाचा परखडपणे स्पष्ट शब्दात समाचार घेतात. परंतु त्यांच्या व्यक्तित्त्वातील या निर्भीडपणामुळे काही हितविरोधकही निर्माण होतात परंतु -

**'जरी अवघड घाट, पाय शाबूत, मनगट**
**लाख वार झाले पाठी, तरी कणा आहे ताठ'**

याप्रमाणे सरांची आंबेडकरवादी जाणीव प्रखरच राहिलीय.''[१७]

अशाप्रकारे गंगाधर पानतावणे यांची लेखनशैली व भाषणशैली ही खरोखरच प्रभावी आणि खरोखरच साहित्यिकांना एक नवी दिशा देणारी अशी आहे.

## गंगाधर पानतावणे यांची स्वभाव वैशिष्ट्ये

गंगाधर पानतावणे वाङ्मयीन जीवनामध्ये सर्वांना मार्गदर्शक असे व्यक्तिमत्त्व तर आहे. पण वैयक्तिक पातळीवर त्यांचे व्यक्तिमत्त्व खरोखर मार्गदर्शक असे आहे. गंगाधर पानतावणे यांच्या घरी 'श्रावस्ती' वर येणाऱ्या जाणाऱ्यांची संख्या फार मोठ्या प्रमाणात आहे. पण त्या सर्वांचा पाहुणचार अगदी आपुलकीने व प्रेमाने होत असे. त्यांच्या घरी गेल्यानंतर आपण बाहेरचे आहोत, असा अनुभवच येत नसे. कारण गंगाधर पानतावणे येणाऱ्या पाहुण्यांना घरातील व्यक्तींसारखीच वागणूक देत असत. त्यांच्या जवळचे स्नेहसंबंध असणारे प्रा. रा. ग. जाधव, डॉ. जनार्दन वाघमारे, प्रा. केशव मेश्राम, प्रा. फ. मु. शिंदे, वामन होवाळ, प्रेमचंद गज्वी, डॉ. श्रीपाल सबनीस, अर्जुन डांगळे, महावीर जोंधळे, प्रा. विश्वास वसेकर, हिरा बनसोडे, डॉ. कृष्णा किरवले, राजेंद्र लातूरकर, डॉ. दादा गोरे, डॉ. भगवान ठाकूर, शशिकांत हिंगोणेकर, डॉ. प्रभाकर मांडे,

डॉ. मनोहर जाधव, प्रा. डॉ. नीळकंठ शेरे, म. भा. परसभाळे, डॉ. जगदीश कदम या सर्व व्यक्तींनी साहित्य, समाज आणि संस्कृती यामध्ये जे लेख लिहिले आहेत त्यावरून गंगाधर पानतावणे यांचे व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू लक्षात येतात.

डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या ओळखीची जवळची कोणतीही व्यक्ती औरंगाबादला गेली तरी मुक्काम पानतावणे सरांकडे असायचा. ही प्रेमाची सक्ती असायची व त्यांच्या बोलवण्यात आत्मीयताही असायची. येणाजाणाऱ्यांची खाण्यापिण्याची सोय घरातच केली जायची. हे सर्व गंगाधर पानतावणे यांची पत्नी डॉ. प्रभावती, त्यांच्या दोन कन्या उत्साहाने पाहुणचार करतात. त्यांच्याकडे कोणी गेले तर सगळा वेळ गप्पा गोष्टी करण्यात व विचारविनिमय करण्यात जातो. एवढेच करून गंगाधर पानतावणे थांबत नाहीत तर येणाऱ्या पाहुण्याला रात्रीच्या रेल्वेला किंवा लक्झरीला बसवूनच गंगाधर पानतावणे शांत व्हायचे. गंगाधर पानतावणे यांच्या लाघवी आणि आग्रही असा पाहुणचार असतो. गंगाधर पानतावणे हे स्वत:ची सर्व कामे स्वत: करतात. यामध्ये लेख मागविणे, विशेषांकाचा पत्रव्यवहार, त्यावर संस्कार, छापण्यासाठी प्रेसवर कितीतरी चकरा, मुद्रित शोधन कामासाठी अनेक फेऱ्या, अंक आणणे, त्यांच्यावर सभासद, भिन्न-भिन्न पातळीचे वर्गणीदार, आजीव सदस्य, लेखक, कवी यांच्या नावे पाठविण्यासाठी, अंकाच्या नीट घड्या घालणे, पत्ते लिहिणे, चिकटविणे, कवी लेखकांची कात्रणे आठवणीने समाविष्ट करणे, सगळे भरून पोस्टाच्या हवाली करणे. ही सर्व कामे गंगाधर पानतावणे व्रतस्थपणे आणि विनाकंटाळा करतात. एवढे सगळे करूनही ते सकाळी लवकर साडेचार वाजता उठणे अशा सर्व गोष्टी करतात.

डॉ. गंगाधर पानतावणे यांनी अनेक प्रकारच्या ग्रंथाची निर्मिती करून साहित्य क्षेत्रामध्ये मोलाची भर घातलेली आहे. अनेक वेगवेगळ्या प्रकारचे लेखन त्यांनी केले आहे. पण हे एवढे मोठे कार्य करण्यासाठी फार मोठ्या व्यासंगाची, ज्ञानाची, चिंतनाची, गरज असते आणि हे सर्व गंगाधर पानतावणे यांनी आपल्या ग्रंथगोतावळ्यावर मिळवले आहे.

डॉ. गंगाधर पानतावणे यांचा लोकसंग्रह तर महत्त्वाचा आहेच परंतु त्यांचा ग्रंथगोतावळा प्रचंड मोठा आहे. गंगाधर पानतावणे यांच्या प्रेमाचा क्रमांक लावायचा ठरवला तर त्यांचे पहिले प्रेम डॉ. बाबासाहेब आंबेडकर, त्यानंतर 'अस्मितादर्श', नंतर बहुजन समाज आणि ग्रंथसंपदा असा लावावा लागेल. गंगाधर पानतावणे यांचे स्वत:चे ग्रंथालय कोणत्याही मराठीच्या प्राध्यापकाला विचार करायला लावणारे आहे. त्यांची ती ग्रंथसंपदा पाहिल्यानंतर प्रचंड भारावून जाण्यासारखे

आहे. त्यांची पुस्तकांची मांडणी, साफसफाई स्वत: गंगाधर पानतावणे लहान बाळाची काळजी घ्यावी तशी करतात. डॉ. दादा गोरे म्हणतात, ''त्यांची पुस्तकांविषयीची काळजी पाहून आमच्या गबाळेपणाची आम्हास लाज वाटते. कोणतेही पुस्तक कुठेच मिळाले नाही तर गंगाधर पानतावणे स्वत:कडचे पुस्तक स्वत: आस्थेने देतात.''

खरोखर गंगाधर पानतावणे यांचे पुस्तकांवर खूप प्रेम आहे. डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार आणि प्रचारासाठी हवी असणारी प्रचंड बुद्धिमत्ता आजही गंगाधर पानतावणे यांच्याजवळ आहे. तरुणांना लाजवणारा उत्साह आणि अथक परिश्रम करण्याची त्यांची जिद्द आजही 'अस्मितादर्श'च्या रूपाने आपणास दिसते.

गंगाधर पानतावणे यांची अभ्यासिका प्रचंड मोठी आहे. एवढ्या मोठ्या प्रचंड कामातूनही कागदपत्रे व्यवस्थित लावून, पुन्हा-पुन्हा सफाई करणे, स्वदेशा आणि परदेशातील अभ्यासक आणि पाहुणे यांची येजा सतत त्यांच्या घरी असते. गंगाधर पानतावणे यांनी जगभरातील माणसे नुसती जोडलीच नाहीत तर ती राखली सुद्धा आहेत. त्यांच्याशी यजमानाच्या भूमिकेतून पडेल ते काम करतात. तेही विनातक्रार पार पाडतात. त्यातूनही ते पाहुण्यांना औरंगाबादच्या सुप्रसिद्ध इतिहास प्रसिद्ध स्थळांची सहल घडवणे अशा त्यांच्या सवयीप्रवृत्ती सांभाळतात. अशा वेगवेगळ्या प्रकारच्या गंगाधर पानतावणे यांच्या स्वभावप्रवृत्ती आपणास दिसतात.

डॉ. गंगाधर पानतावणे यांचा स्वभाव कडक आहे. ते लवकर चिडतातही तसेच त्या तुलनेने ते शांतही होतात. पण त्यांचा कणखरपणा मात्र कायम असतो. कोणाबरोबरही झालेल्या वादामुळे ते लगेच रागावतात पण कालांतराने हा राग निवळतोही. एखाद्या कामासाठी समोरच्या माणसाने सांगितलेले कारण त्यांचे कधी समाधान करीत नाही. कधी-कधी अस्मितादर्शवर हजर न राहिल्याबद्दल किंवा लेखन वेळेवर न पाठवल्याबद्दल ते कधी-कधी राग व्यक्त करतात. पण त्या रागाचा सूरही संस्कारमय असतो. पण गंगाधर पानतावणे कधीही रागात असले तरी वाईट शब्द किंवा अपशब्द वापरत नाहीत.

डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या जीवनशैलीची वैशिष्ट्ये तर आपण पाहिलीच आहेत. त्याचप्रमाणे त्यांचे वाङ्मयीन कार्यही पाहिले आहे. डॉ. गंगाधर पानतावणे यांची एक ज्येष्ठ सहकारी आणि विभागप्रमुख म्हणून त्यांची कार्यशैली कौतुकास्पद आहे. मराठी विभागाचे विभागप्रमुख म्हणून डॉ. गंगाधर पानतावणे यांनी केलेले कार्य शैक्षणिकदृष्ट्या फार महत्त्वाचे असे आहे.

विद्यापीठाच्या विभागाचे नेतृत्व कसे करावे हे गंगाधर पानतावणे यांच्या कार्यावरून लक्षात येते. त्यांनी लोकशाही प्रक्रियेने निर्णय घेणे, सहकाऱ्यांवर संपूर्ण विश्वास ठेवणे आणि त्यांना पूर्णत: विश्वासात घेणे, शैक्षणिक, वाङ्मयीन उपक्रमांना सक्रिय प्रोत्साहन देणे ही त्यांची प्रशासन-वैशिष्ट्ये म्हणता येतील. विविध साहित्यिक सांस्कृतिक कार्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करणे, साहित्यासंबंधी गोडी उत्पन्न करून त्यांच्यामध्ये वाङ्मयासंबंधी स्वतंत्रपणे विचार करण्याची सवय निर्माण करणे अशा प्रकारचे उपक्रम त्यांनी राबवले.

त्याचबरोबर गंगाधर पानतावणे यांची वाङ्मयीन भूमिका मूल्यधिष्ठित जीवनदृष्टीचा पुरस्कार करणारी आहे. ते वाङ्मयाच्या वाङ्मयतत्त्वाचे भान कधीही सुटू देत नाहीत. त्यांचा साहित्यविचार उथळ प्रचारकीपणा कंठाळी घोषणाबाजी कधीही नसते. असे असले तरी वाङ्मयीन चळवळीचे प्रवर्तक आहेत. विद्यार्थ्यांनी सर्व प्रकारच्या वाङ्मयीन भूमिका अभ्यासल्या पाहिजेत. सर्व वाङ्मयीन प्रवाहातील साहित्यकृतीचे चौफेर आणि जाणीवपूर्वक वाचन केले पाहिजे असे प्राध्यापक म्हणून त्यांचे सांगणे होते. नवे-जुने प्राचीन-अर्वाचीन सौंदर्यवादी - सामाजिक जाणिवेचे असे सर्व प्रकारचे समीक्षात्मक आणि ललित साहित्य अभ्यासकांनी अभ्यासले पाहिजे. असे ते आग्रहाने सांगतात. गंगाधर पानतावणे नव्या पिढीतील वाचनाची गोडी कमी होत असल्याबद्दल अनेकदा खंत व्यक्त करतात. समाजातील सर्वच स्तरांवरील वाचनाची आवड कमी होत आहे. अंतिमत: समाजाची सांस्कृतिक हानी ठरेल अशी भीती ते व्यक्त करतात. अशाप्रकारे वरील विवेचनावरून गंगाधर पानतावणे यांची वाङ्मयाबद्दलची आंतरिक ओढ निष्ठापूर्ण अध्ययन व अध्यापन आणि व्यासंगी व उपक्रमशील असा त्यांच्यातील प्राध्यापक आपणास दिसतो.

## 'अस्मितादर्श' चे कार्य

डॉ. गंगाधर पानतावणे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार समाजापर्यंत पोहचविण्यासाठी, दलित साहित्य चळवळीला व नवोदित लेखकांना एक व्यासपीठ निर्माण व्हावे म्हणून काही सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी १९६८ मध्ये 'अस्मितादर्श' या नियतकालिकाची स्थापना केली.

आंबेडकरी तत्त्वज्ञानाचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी त्यांनी मराठीतल्या अनेक साहित्यिकांना जवळ घेतले, सोबत घेतले. यामध्ये त्यांनी कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता अनेक लेखकांनी अस्मितादर्शमध्ये लेखन केले आहे. भटक्या, विमुक्त, आदिवासी साहित्यिकांनाही

'अस्मितादर्श'ने कवी, लेखक, साहित्यिक बनवले. अस्मितादर्श ही एक चळवळ आहे आणि त्यामध्ये सर्वांना सामील करून द्यावे अशी गंगाधर पानतावणे यांची भूमिका आहे.

डॉ. गंगाधर पानतावणे यांनी अस्मितादर्शचे अनेक मेळावे घेतले. हे मेळावे म्हणजे साहित्य संमेलनासारखे मेळावे होते. वामन होवाळ अस्मितादर्शच्या पहिल्या मेळाव्याचे वर्णन करताना म्हणतात, "सकाळी साडे नऊ वाजता अस्मितादर्शच्या मेळाव्याला सुरुवात झाली. स्वत:च्या मंगलकार्यात सहभागी व्हावं इतक्या उत्साहाने सर्वजण उपस्थित होते. मला वाटतं त्या मेळाव्याला अध्यक्ष म्हणून कुणी नव्हतं. प्रा. म. भि. चिटणीस अध्यक्ष असल्यासारखे वाटत होते. त्यांच्या विचारधनाने मला भारावल्यासारखे झाले होते. उपस्थित असलेल्या बहुसंख्य वाचक श्रोत्यांबरोबरच 'अस्मितादर्श'चे अडीच-तीनशे लेखक हजर होते. मेळाव्याचं सरासरी वय पस्तीस ते चाळीस असावं, म्हणजेच नव्या विचारांचा तरुण खळाळ तिथं निर्माण झाला होता. मी तसा त्यावेळी एकाकी होतो. चौकशी करताना त्यातले शे-पाऊणशे प्राध्यापक असल्याच कळलं. प्रा. गंगाधर पानतावणे सहजपणे वावरत होते. मध्यमधारी उंची, सणसणीत शरीर, लवलवता उत्साह. अशा स्वरूपात मी प्रा. पानतावण्यांना पहात होतो. त्यांच्यात मानभावीपणा नव्हता किंवा आपण काही अलौकिक कार्य आरंभले आहे असा भावही नव्हता. त्यांच्याकडे होती ती फक्त स्वाभाविकता, सहजता. तसं सगळं वातावरणचं सहजसुंदर भाव व्यापून राहिले होतं."

या अस्मितादर्शच्या मेळाव्यासाठी अनेक ज्येष्ठ श्रेष्ठ असे साहित्यिक उपस्थित होते. यामध्ये बाबूराव बागुल, दया पवार, प्रा. केशव मेश्राम, फ. मु. शिंदे, रा. रं. बोराडे, वामन इंगळे, बाबा आढाव, कुमार महर्षी, वसंत मून, अशोक बागवे, शशिकांत मर्गन, प्रल्हाद चेंदवणकर हे होते. या मेळाव्यामध्ये घणाघाती भाषणे, आशयगर्भ परिसंवाद, आसमंत चेतवणारे कविसंमेलन, शोध निबंध वाचन, कथाकथन. सर्वच कार्यक्रम अस्मितादर्शच्या मेळाव्यात होते. यामध्ये आंबेडकर तत्त्वज्ञानाची परिवर्तनीय दृष्टी आणि आंबेडकरी प्रबोधनासाठी अस्मितादर्शची निर्मिती केली आहे असे वाटते.

'अस्मितादर्श' लेखक मेळावा म्हणजे एक मोठा शब्दोत्सवच असतो. स्वत:च्या खिशातील पैसे खर्च करून दलित लेखक, कवी, नाटककार, कथाकार, वाचक, श्रोते उत्स्फूर्तपणे अस्मितादर्शच्या मेळाव्यात दरवर्षी सहभागी होतात. डॉ. गंगाधर पानतावणे यांनी १९९१ मध्ये मध्यप्रदेशच्या साहित्य मेळाव्याचे अध्यक्षपद वामन होवाळांना दिले. परंतु वामन होवाळांनी आपल्याला अध्यक्षीय

भाषण लिहिणे जमणार नाही असे सांगितल्यावर गंगाधर पानतावणे म्हणाले, ''तुम्ही अध्यक्षीय भाषण लिहायला सुरूवात करा तुमच्याकडे चांगला विचार आहे.''याप्रमाणे वामन होवाळांनी भाषण लिहिलं आणि हे भाषण गाजलही. ही संधी त्यांना अस्मितादर्शमुळे मिळाली व या प्रेरणेने त्यांनी अनेक वैचारिक लेखन ही केले आणि छोट्या-छोट्या साहित्य संमेलनाची अध्यक्षीय निमंत्रणही स्वीकारली.

विशेषांक प्रकाशित करणं 'अस्मितादर्श' ची 'खासियत' आहे. 'दलित शाहिर आणि शाहिरी' असा एक विशेषांक डॉ. गंगाधर पानतावण्यांनी प्रकाशित केला. शाहिरी ही कला मुळातच उपेक्षितांची. त्यात ती पुन्हा 'दलित शाहिरी, 'उपेक्षितांचीही उपेक्षित.' परंतु डॉ. गंगाधर पानतावणे यांनी या उपेक्षित लोकवाङ्मयाची दखल घेऊन संग्रह केलेला असा विशेषांक निर्माण केला. वर्तमानाला कोणत्या गोष्टी हव्यात, भविष्यासाठीही काही सोयी करून कुशल संपादकीय काम, भूतकाळाचा वेध घेऊन करावं लागते. त्यातूनच 'शिक्षण व संस्कृती', 'धर्म आणि संस्कृती', 'दलित आत्मकथा', 'आंबेडकर शताब्दी', 'भारतीय संविधान' असे कितीतरी विषय हुडकून संपादकीय कौशल्याचा प्रत्यय साहित्य सृष्टीला दिला.

अस्मितादर्शने आणखी एक महत्त्वाचे कार्य केले ते म्हणजे रंगभूमी नाटक. हा डॉ. गंगाधर पानतावणे यांचा आवडीचा विषय. त्यांनी एकांकिका, नाटकही लिहिले. दलित रंगभूमी अस्तित्वात आलीही नव्हती तेव्हा 'कुठाय दलित नायक' असा प्रश्न गंगाधर पानतावणे विचारतात. रंगमंचावर दलित रंगभूमीची परिस्थिती बरी वाटल्यावर त्यांनी अस्मितादर्शचा 'दलित रंगभूमी' विशेषांकच प्रकाशित केला. दलित रंगभूमी समजून घेण्यासाठी, अभ्यासण्यासाठी गंगाधर पानतावणे यांचा हा विशेषांक पुरेसा आहे.

१९८८ च्या मे महिन्यात जळगावला अस्मितादर्शचा मेळावा झाला होता. त्यामध्ये डॉ.श्रीपाल सबनीस यांना गंगाधर पानतावणे यांनी बोलवले होते. कॉ. शरद पाटील, डॉ. भालचंद्र फडके, श्री. बाळासाहेब चौधरी हेही होते. कॉ. शरद पाटील यांनी परिसंवादात जे वक्तव्य केले ते डॉ. श्रीपाल सबनीस यांनी अगदी अचानक खोडून काढले. कॉ. शरद पाटलांना या मांडणीचा व त्यांच्या भूमिकेचा हादरा बसला व दुसऱ्या दिवशी शरद पाटील यांनी आक्रमक भाषण करून आपला संताप व्यक्त केला. याचे वैचारिक प्रवाहात मोठ्या प्रमाणात पडसाद उमटले. त्यातूनच 'ब्राह्मणी सत्यशोधक' या ग्रंथाची निर्मिती झाली. हे सर्व गंगाधर पानतावणे व अस्मितादर्शमुळे

झाले आहे. त्यानी एका मोठ्या विद्वानाला आव्हान देऊन आपले कर्तृत्व सिद्ध केले. त्यांनीच डॉ. श्रीकांत सबनीस यांच्यातील अभ्यासकाला जन्माला घातले. त्यांच्यासारख्या अभ्यासकाला अस्मितादर्शने आपले करून घेतले. गंगाधर पानतावणे यांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे त्यांनी नव्या जाणीवांची निर्मिती करणाऱ्या कित्येक सवर्ण दलित अभ्यासकांना अस्मितादर्शसारखे व्यासपीठाची त्यांनी निर्मिती केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीमध्ये डॉ. चिटणीस, टिपणीस, सहस्त्रबुद्धे इत्यादी सवर्ण होतेच. तोच प्रवाह विकसित करण्याचा प्रयत्न अस्मितादर्शने केला आहे.

महाराष्ट्रात दलित साहित्य चळवळ रूजली व या चळवळीला प्रवाहीपणा व गतिमानता देण्याचे काम अस्मितादर्शने केले. याचे उदाहरण म्हणजे अर्जुन डांगळे स्वत: म्हणतात की माझ्या वाङ्मयीन कर्तृत्वाला पुढे आणण्याचे काम अस्मितादर्शने केले.

१९६४ नंतर दलित साहित्यामध्ये साहित्याची भूमिका व वैचारिक बैठक दलित समाजातील विचारवंत समीक्षकांकडून मांडली जावू लागली. नव्या जाणिवांनी भारावलेले अनेक तरुण लेखक कवी लिहू लागले होते. रिपब्लिकन पक्षातील गटबाजी, या गटातटाच्या निष्क्रियेतून आलेली मरगळ, प्रचलित प्रश्नातून दाहक होत जाणारं सामाजिक वास्तव ही पार्श्वभूमी या दलित लेखकांना होती. 'अस्मितादर्श' मध्ये सगळे शब्दबद्ध होत होते. नव्या वाङ्मयीन लेखकांना आपली पावले वाङ्मयीन क्षेत्रात उमटवण्याची संधी 'अस्मितादर्श'मुळे मिळाली. दया पवार, वामन निंबाळकर, उमाकांत, रणधीर, अर्जुन डांगळे, ज. वि. पवार, त्र्यंबक सपकाळे, सुधाकर गायकवाड, फ. मु. शिंदे, राम दोतोंडे यासारखे कवी. ताराचंद खांडेकर, योगीराज वाघमारे, अविनाश डोळस, योगेंद्र मेश्राम, भीमराव शिरवाळे, ही सुरूवातीच्या काळातील काही नाव आहेत. नंतरही अस्मितादर्श मधून तयार झालेल्या अनेक लेखकांची यादी आहे.

अस्मितादर्श म्हणजे गंगाधर पानतावणे यांचे एक गुरूकुलच आहे. यामध्ये जे जे काही आहे ते सर्व देण्याची परंपरा ही या गुरुकुलाची आहे. एखाद्याने नवीन काही लिहिले तर ते छापून त्याला प्रेरणा देण्याचे काम अस्मितादर्शने केले आहे. अनेक वेगवेगळ्या ठिकाणच्या लेखक वाचकांना एकत्र आणण्याचे काम अस्मितादर्शने केले आहे. अस्मितादर्शच्या वार्षिक मेळावे व संमेलने यातून साहित्याकडे पाहण्याची डोळस दृष्टी लाभली आहे. अस्मितादर्शच्या प्रत्येक अंकातून डॉ. पानतावणे यांच्या वाङ्मयीन, सांस्कृतिक, सामाजिक दृष्टिकोनाचा परिचय होत असतो. अस्मितादर्शच्या प्रत्येक अंकामध्ये त्यांचा संपादकीय ठसा उमटलेला असतो.

अस्मितादर्श हे नियतकालिक निघाले तेव्हा महाराष्ट्रामध्ये सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक अशा सर्व क्षेत्रातील संक्रमणाचा काळ होता. शिक्षणाचा प्रसार खेड्यापाड्यातून होत होता. अनेक पिढी शिक्षित होत होती. या काळात समाजामध्ये अनेक बदल घडत होते. या काळात नवशिक्षितांना योग्य दिशा देण्याचे काम डॉ. गंगाधर पानतावणे यांनी अस्मितादर्शच्या रूपाने केले.

अशाप्रकारे अस्मितादर्शचे वार्षिक मेळावे कोल्हापूर, जळगाव, औरंगाबाद असे संपूर्ण महाराष्ट्र भर झालेले आहेत. हे सर्व मेळावे उत्साहाने व स्थानिक लोकांच्या पुढाकाराने भरविले जात होते. दलित साहित्य संमेलन असेच या मेळाव्याचे स्वरूप होते. या मेळाव्यामध्ये होणारे कार्यक्रमही अभ्यासपूर्ण व दर्जेदार असे होते. हे मेळावे म्हणजे आधुनिक मराठी साहित्यातील एक अपूर्व 'सांस्कृतिक पर्व' असे म्हणता येईल.

अशा तऱ्हेने अस्मितादर्शचे कार्य हे फार महत्त्वपूर्ण असे आहे. अस्मितादर्शचा गाभा म्हणजे दलित साहित्य चळवळ आणि सांस्कृतिक व वाङ्मयीन कार्य होय. हे कार्य म्हणजे संशोधन कार्य, कल्पक, गतिमान व उपक्रमशील संपादनकार्य, नव लेखकांना शोधून त्यांना उत्तेजन व प्रोत्साहन देण्याचे कार्य गंगाधर पानतावणे यांनी केले. त्याचबरोबर त्यांनी स्वतंत्रपणे स्फूट लेखन व ग्रंथलेखन केले. यासाठी त्यांनी स्वत: पदरमोड केली. अशाप्रकारे गंगाधर पानतावणे यांचे महत्त्वपूर्ण असे वाङ्मयीन कार्य आहे.

## गंगाधर पानतावणे यांचे स्तंभलेखन

मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक समाजप्रबोधनाची चळवळ करणारे विचारवंत, समीक्षक तर आहेच पण त्याचबरोबर त्यांनी फार मोठ्या प्रमाणात वैचारिक आणि ललित लेखन केले आहे. यामध्ये त्यांनी कविता, नाटक, समीक्षा, संशोधनपर लेख, वैचारिक लेख, अशाप्रकारखे लेखन केलेच त्याचबरोबर त्यांनी अस्मितादर्श हे समाज प्रबोधन करणारे नियतकालिक काढले. त्याचबरोबर त्यांनी वृत्तपत्रीय स्तंभलेखनही केले आहे.

डॉ. गंगाधर पानतावणे यांनी साहित्याच्या विविध प्रकारामध्ये लेखन केले आहे. स्तंभलेखन या रचनाप्रकारामध्येही लेखन केले आहे. स्तंभलेखन या रचनाप्रकाराला दीडशे वर्षाची परंपरा लाभलेली आहे. पण हा रचनाप्रकार साहित्यक्षेत्रामध्ये जास्त प्रमाणात प्रकाशझोतात आलेला नाही. स्तंभलेखन करण्याचे काम मोठमोठ्या साहित्यिकांनी केले आहे व ते सुद्धा पूर्वी समाज-प्रबोधनाच्या दृष्टिकोनातून हे लेखन झाले आहे.

स्तंभलेखन या रचनाप्रकारामध्ये १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात समाजप्रबोधनाच्या आणि सामाजिक जागृतीच्या दृष्टीने वृत्तसृष्टीचे प्रवर्तक 'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकर यांनी 'प्रभाकर' हे साप्ताहिक १९४१ साली सुरू झाले. लोकहितवादींचे शतपत्रे त्याचप्रमाणे १८४६ मध्ये हरिभाऊ आपटे यांनी सुरू केलेले 'करमणूक'मधून सगुणाबाईंची मुलीस पत्रे आणि गोविंदारावांची मुलांस पत्रे अशी प्रबोधनकारी स्तंभ प्रारंभीच्या काळात गाजले. सामाजिक आणि राजकीय विषयावरील चिकित्सक विचार व भाष्य 'संदेश'च्या 'वत्सला वहिनींच्या पत्रा'तून प्रकट होई. त्याचप्रमाणे केसरीतून ही विविध सदरे येऊ लागली.

अमेरिकेतही स्तंभलेखन हा अत्यंत लोकप्रिय वृत्तपत्रीय लेखनप्रकार आहे. शंभर वर्षापूर्वी म्हणजे १८९० मध्ये 'शिकागो डेली' वृत्तपत्रातून 'शार्प्स अॅण्ड फ्लॉटस्' या मथळ्याखाली त्यांनी स्तंभलेखन केले आहे. तो स्तंभलेखनाचा प्रारंभ होय. १९३० नंतर वॉटर लिपमन सारख्यांनीही स्तंभलेखन केले. त्यानंतर जॅक अॅन्डरसन सारख्या लेखकाचे स्तंभ गाजले.

वृत्तपत्रीय लेखनप्रकारात स्तंभलेखन हा वाढता वाङ्मयप्रकार आहे. यामध्ये भारतीय पत्रकारितेत अशाप्रकारे विविध विषयांवरील स्तंभ लिहिणाऱ्या नामवंत पत्रकारांची किंवा साहित्यिकांची मालिकाच आढळले. यामध्ये 'लंडनची बातमीपत्रे' द. वि. ताम्हणकर, 'राजधानीतून' गंगाधर इन्दूरकर, विजय तेंडुलकरांची 'कोवळी उन्हे', द. ता. भोसले यांचे 'पार आणि शिवार', प्रमोद नवलकरांचे 'महानगरीय' तसे प्रभाकर पाध्ये यांचे 'आभाळातील अभ्रे', बाळ गाडगीळ यांचे 'सकाळचे उन', प्रा. म. वि. राजाध्यक्ष यांचे 'पाक्षिकी', लक्ष्मण माने यांचे 'बंद दरवाजा', स्त्रीवादी चळवळीच्या अभ्यासू नेत्या छाया दातार यांनी 'स्त्री पुरुष' नावाचे स्तंभ लिहिले.

अशा कितीतरी लेखकांनी समाजजीवनावर आधारित, वाङ्मयीन जीवनावर आधारित असे स्तंभलेखन केले. या स्तंभलेखामध्ये ग्रामीण जीवन, शहरी जीवन, गुन्हेगारी जगतातले जीवन असे विविध प्रश्न या स्तंभलेखनातून मांडले आहेत. यावरून आपणाला सामाजिक, राजकीय, क्रीडा, स्त्रीविषयक, ग्रामीण, शैक्षणिक अशी विविध स्तंभलेखनाची वैशिष्ट्ये सांगता येतील.

त्याचप्रमाणे गंगाधर पानतावणे यांनीही स्तंभलेखन केले. मुकुंद संगोराम, प्रमोद माने आणि दत्ता सांगळे यांनी सुचवलं त्याप्रमाणे गंगाधर पानतावणे यांनी २००५ मध्ये 'दैनिक लोकसत्ता' औरंगाबादमधून स्तंभलेखन केले. गंगाधर पानतावणे यांनी जे लेखन केले त्यामध्ये त्यांनी खरोखरच घटनांचा, विचारांचा, सर्जनाचा, कलात्मकतेचा, सांस्कृतिक आणि सामाजिक अंगाचा आणि अंतरंगाचा वर्षभर शोध घेतला आणि त्याचाच आविष्कार म्हणजे 'अर्थ आणि अन्वयार्थ' होय.

गंगाधर पानतावणे यांनी जे स्तंभलेखन केले आहे, त्यामध्ये विविध प्रकारचे लेख लिहिले आहेत. तसेच त्यांनी वैशिष्ट्यपूर्ण असे स्तंभलेखन केले आहे. समाजामध्ये अनेक घटना एवढ्या प्रभावशाली असतात की त्या घटनांविषयी सहज प्रतिक्रिया उमटली जाते. या प्रतिक्रियेतूनच गंगाधर पानतावणे यांनी सामाजिक, राजकीय, धार्मिक, स्त्रीविषयक, बालविवाह, शैक्षणिक, चित्रपट, वाङ्मयीन इत्यादी विविध क्षेत्रातील घटनांची वैचारिक बाजू स्तंभलेखनातून मांडली आहे.

गंगाधर पानतावणे यांनी समाजामध्ये घडणाऱ्या विविध घटनांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये थोडेसे अवती भवती पाहिले की कितीतरी घटना लक्ष वेधून घेत असतात. काही घटना जीवनाचा नवा अर्थ विशद करतात तर काही घटनांना चिरंतनाचा स्पर्श असतो. काही अस्वस्थ करणाऱ्या असतात तर काही अत्तरासारख्या उडून जाणाऱ्या असतात. काही मनात घर करून राहतात. या सर्व घटनांचा आशय शोधणे आणि त्याचा अन्वयार्थ लावणे हा संवेदनशील मनाचा धर्म असतो. माणूस शोधणे फार अवघड असते. त्याची वृत्ती, प्रवृत्ती, संस्कारक्षमता आणि विकृती या सर्वांचा शोध म्हणजेच अभिव्यक्तीचा ध्यास व या ध्यासापासून गंगाधर पानतावणे यांनी आपल्या स्तंभलेखनातून विविध घटनांचा, सर्जनांचा, कलात्मकतेचा, सांस्कृतिक आणि सामाजिक अंतरंगाचा शोध घेतला आहे.

गंगाधर पानतावणे यांनी आपल्या वैचारिक आणि ललित लेखनामध्ये जी वैचारिक आणि सामाजिक बाजू मांडलेली आहे. त्याच प्रकारचे लेखन त्यांनी आपल्या स्तंभलेखनातून केले. यामध्ये त्यांनी निरंजन उजगरे या कवीचा मृत्यू झाल्यानंतर व्यक्त केलेले दुःख, तसेच प्रा. रा. ग. जाधव या साहित्यिकाला घर कशाप्रकारे मिळाले आणि त्यांना साहित्यातून मिळालेली श्रीमंती, त्याचप्रमाणे संमेलनाचे सूप वाजले यामध्ये नाट्यसंमेलन आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन एकाच वेळी भरल्यामुळे उडालेला गोंधळ, तसेच त्यांनी 'बखर ! एका राजाची' यामध्ये त्र्यं. वि. सरदेशमुख, दत्ता गायकवाड, योगीराज वाघमारे यांच्याशी साधलेला संवाद तसेच त्यांनी सूर्यकुलातील कवीचा गौरव, तांडा काराचे निर्वाण, अठरा तास अभ्यास यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेला अभ्यास, त्याचप्रमाणे लावणीचे लावण्य हरपले यामध्ये कलाकारांच्या जीवनाचा घेतलेला वेध, त्याचप्रमाणे 'ग्रामस्वराज्याचे स्वप्न' या लेखामध्ये पावसाच्या कमी-जास्त प्रमाणामुळे विस्कळीत होणारे जनजीवन, आरोग्य, अंधश्रद्धा, अल्पवयातल्या विवाहामुळे माता आणि मूल चिंतेची बाबा, कुपोषण असे अनेक प्रश्न मांडलेले आहेत. त्याचप्रमाणे 'श्यामची

आई' व 'श्वास' या चित्रपटांना राष्ट्रपती सुवर्ण पदक मिळाले तेव्हा लोकांच्यामध्ये होणारा आनंद व या चित्रपटांना लोकांनी केलेली मदत व याची दुसरी बाजू म्हणजे ज्यावेळी सुनामीचा हाहाकार देशामध्ये झाला तेव्हा लोकांनी मिळून पुढे केलेला मदतीचा हात आणि एखाद्या पुरुषाने केलेला मुलीवरील जबरदस्ती हा अंगावर शहारे आणणारा प्रसंग, अशावेळी होणारी लोकांची मदत व लोकांची प्रवृत्ती याचे वेगवेगळे चित्र गंगाधर पानतावणे यांनी 'हे चित्र' आणि 'ते चित्र!!' या लेखात दाखवले आहे. 'सीमावासियांचा संघर्ष', 'मुकी मेंढरे कुणीही हाका' आणि 'घेणाऱ्याचे हात हजार' या लेखामध्ये त्यांनी सामाजिक आणि राजकीय प्रश्न हाताळले आहेत. तसे त्यांनी विद्यार्थ्यांच्या शिस्तीवरील प्रश्न, शैक्षणिक संस्थांचे अनुदान अशा विविध लेखांमध्ये त्यांनी शैक्षणिक प्रश्न मांडलेला आहे.

असे विविध प्रकारचे, विविध विषयावरील लेखन करून त्यांनी विविध घटनांचा परामर्श घेतलेला आहे. अशा लेखामध्ये जी सत्यता दडलेली आहे ते सत्य समाजापुढे नकळतपणे मांडण्याचा प्रयत्न या ठिकाणी गंगाधर पानतावणे यांनी केला आहे.

डॉ. गंगाधर पानतावणे यांनी 'दै. लोकसत्ता' यामधून जे स्तंभलेखन केले आहे. त्यामध्ये राजकीय, धार्मिक, वाङ्‌मयीन, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा अशा विविध घटकांमधील घटनांचा आढावा त्यांनी घेतलेला आहे. हे करत असताना समाजातील विविध समस्यांचा, वादांचा, घटनांचा परामर्श साध्या व सरळ भाषेत, ललित शैलीने हे स्तंभलेखन त्यांनी केले आहे. त्यामुळेच त्यांच्या स्तंभलेखनाला मोठा वाचकवर्ग लाभलेला आहे. याचा प्रत्यय त्यांना लेखन काळामध्ये विविध पत्राद्वारे आलेला आहे.

स्तंभलेखनामुळे मोठ्या प्रमाणात समाजजागृती व विचार जागृती झालेली आहे. स्तंभलेखनाच्या सुरुवातीला जे स्तंभलेखन झाले त्यातून होणाऱ्या सामाजिक विचारजागृतीमुळे समाजातील पूर्वापार चालत आलेले संकेत, रूढी, चालीरीती, अंधश्रद्धा आणि धर्म संकल्पना यांना तडे जाऊ लागले. नवी संस्कृती निर्माण व्हावी, नव्या बाण्याची, नव्या निर्धाराची मने तयार व्हावी या दृष्टिकोनातून हे स्तंभलेखन झाले याच दृष्टिकोनातून अनेकांनी स्तंभलेखन केले आहे, करत आहेत. त्याचप्रमाणे गंगाधर पानतावणे यांनी महाराष्ट्रीय संस्कृतीत वाढलेल्या पण नव्या संस्कृतीच्या हव्यासातून अनेकांनी स्तंभलेखन केले.

डॉ. गंगाधर पानतावणे यांनी जे स्तंभलेखन केले, त्यांची शैली, व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोन, जनसमुदायाची मानसिकता हे सर्व लक्षात घेऊन स्तंभलेखक आपले विचार, भावना लोकांना विश्वासात घेऊन अनेक घटनांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न स्तंभलेखनातून करत असतो.

डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या स्तंभलेखनातील व्यक्तिचित्रण, प्रसंग, भाषाशैली आणि संवादशैली अंतर्मुख करणारी आहे. स्तंभलेखनामध्ये समाजाचा विचार करणे फार महत्त्वाचे असते कारण स्तंभातून दंभाचा स्फोट घडला की समाज स्तंभित होतो. हे विचारात घेऊनच त्यांनी अक्षरांचा, शब्दांचा, संवादाचा आणि भाषेचा वापर केला आहे. आणि लोकांना स्तंभलेखनाकडे अंतर्मुख करण्याचा प्रयत्न केला आहे. समाजामध्ये अनेक घटना घडत असतात. त्या घटना एवढ्या प्रभावशाली असतात की त्या घटनांविषयी सहज प्रतिक्रिया उमटली जाते. सामाजिक, राजकीय, धार्मिक, स्त्रीविषयक, शैक्षणिक, सांस्कृतिक, बालविवाह, चित्रपट, वाङ्मयीन, शेतीविषयक अशा विविध विषयांमध्ये घडणाऱ्या घटनांची वैचारिक बाजू व लोकांच्या मानसिक व बौद्धिक विचारांची बाजू यांचा अर्थ आणि अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न गंगाधर पानतावणे यांनी आपल्या स्तंभलेखनातून केला आहे.

स्तंभलेखन हा रचनाप्रकार फार मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध झालेला आहे. दर्जेदार असे साहित्य लिहिणाऱ्या लेखकांनी अनेक वृत्तपतामधून स्तंभलेखन केले आहे. त्यामुळे अशा या स्तंभलेखनाला दर्जेदार वाचकही लाभले आहेत. केवळ मराठीमध्येच असे स्तंभलेखन होते असे नाही तर अनेक इंग्रजी, हिंदी या भाषेतूनही हे स्तंभलेखन होते.

गंगाधर पानतावणे यांनी विविध विषयाच्या अनुषंगाने जे स्तंभलेखन केले आहे, ते खरोखरच दर्जेदार असे लेखन केले आहे. अनेक विस्मरण झालेल्या घटनांना त्यांनी प्रकाशात आणले आहे. अनेक अवघड विषयांना आपल्या लेखनशैलीने त्यांनी सोपे केले आहे. अनेक वेगवेगळ्या विषयांना प्रकाशात आणून किंवा समाजा पुढे आणून त्याला न्याय देण्याचा प्रयत्न गंगाधर पानतावणे यांनी आपल्या स्तंभलेखनातून केले आहे. अनेकांच्या दुःखांना त्यांनी समाजापुढे मांडले आहे. त्यांनी अनेक स्थानिक विषयापासून ते सुप्त गोष्टीपर्यंतच्या अनेक विषयांचा समावेश त्यांनी आपल्या लेखामध्ये केला आहे व हे लेखन करत असताना साधी सोपी भाषा व अवती भवतीच्या जीवनातील उदाहरणे त्यांनी दिलेली आहेत.

गंगाधर पानतावणे यांनी निरंजन उजगरे नावाच्या कवीचा त्यांच्या मृत्यूनंतर दु:ख व्यक्त केले आहे. निरंजन उजगरे यांनी कितीतरी कवितांचे भाषांतर केले आहे. तेही मूळ कवितांचे रूप विस्कटू न देता. त्याचप्रमाणे कुसुमाग्रजांनी आरंभलेल्या 'जनस्थान पुरस्कार याची प्रतिमा आणि प्रतिष्ठा वेगळीच आहे. हा पुरस्कार पहिल्यांदा विजय तेंडुलकरांना दिला. नंतर नारायण सुर्वे यांना हा पुरस्कार मिळाला त्याबद्दल त्यांचा गौरव केला आहे.

तसेच काळाराम मंदिर प्रवेशाबाबत पंचाहत्तर वर्ष पूर्ण झाले याबद्दल नाशिकच्या सुधीरदास महाराजांनी प्रायश्चित्त म्हणून काळाराम मंदिरात पाच दलित दाम्पत्यांना पूजेला बसवलं आणि स्वत:च पौरोहित्य केलं. त्याचबरोबर स्त्रीजन्मा, तुझी कहाणी ! यामध्ये स्त्रियांचा हक्काचा प्रश्न, स्त्री चळवळीबद्दल विचार मांडले आहेत. तसेच पठ्ठे बापुराव, कुसुमाग्रज ते आण्णाभाऊ साठे यांनी केलेले मुंबईचे वर्णन पाहता मुंबईचे शांघाय होणे सोपे आहे काय याचे सुंदर चित्रण 'अरे शांघाय ! शांघाय !!' यामध्ये केले आहे.

'जातीच्या बेटावरील माणसं' यामध्ये आंतरजातीय विवाहाचा मोठा प्रश्न मांडलेला आहे. अंधश्रद्धामध्ये अनेक श्रद्धा, अंधश्रद्धा, अतिरेकी श्रद्धा जोपासल्या यामध्ये मोंगीरबाबाला मुक्या प्राण्यांचा बळी देणे, यातून कितीतरी निष्पाप लोकांचा बळी जातो अशा अंधश्रद्धा विज्ञानयुगात जोपासल्या जातात याची खंत वाटते.

'नवा शिपाई' या लेखामध्ये कवितेच्या युगातले क्रांतिकारक कवी म्हणून केशवसुत यांना ओळखले जाते. त्यांनी आपल्या कवितातून सामाजिक प्रश्न मांडण्यास सुरुवात केली. 'सीमावासीयांचा संघर्ष' यामध्ये मुंबई, बेळगाव, निपाणी, भालकी, कारवार हा संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे हा प्रश्न त्यांनी आपल्या लेखामध्ये मांडला. अशा वेगवेगळ्या प्रकारच्या विषयावरील लेखन त्यांनी केले आहे.

अशा प्रकारे गंगाधर पानतावणे यांनी जे स्तंभलेखन केले आहे ते सामाजिक आणि वाङ्मयीन-दृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण असे लेखन केले आहे. स्तंभलेखनाला दीडशे वर्षाची परंपरा लाभलेली आहेच त्याचबरोबर असे स्तंभलेखनही अनेक नामवंत लेखकांनी केले आहे. त्यामुळे स्तंभलेखन हा एक प्रभावी असा वाङ्मयीन रचनाप्रकार वाटतो.

गंगाधर पानतावणे अजूनही दैनिक लोकसत्तामध्ये जीवनदर्शन या नावाखाली स्तंभलेखन करत आहेत. यावरूनच अजूनही त्यांचा लिहिण्याचा व्यासंग केवढा आहे हे आपल्या लक्षात येते.

त्यांची लेखनशैली, त्यांची भाषाशैली, शब्दाची मांडणी एवढी प्रभावशाली आहे की आपोआपच स्तंभलेखाचा वाचक हा प्रभावित होऊन स्तंभलेखन वाचनाकडे आकर्षिला जातो.

गंगाधर पानतावणे यांचे वाङ्मयीन व्यक्तित्त्व आणि स्तंभलेखन वेगळे करता येत नाही. त्यांनी स्वत:च एक स्वत:ची वेगळी परंपरा निर्माण केली आहे हे त्यांच्या साहित्य विवेचनावरून आपल्या लक्षात येते. हे सर्व त्यांच्या साहित्यावरून आणि 'अस्मितादर्श'च्या कार्यावरून लक्षात येते. त्यांनी अस्मितादर्शमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराला जी चालना दिली त्याचबरोबर त्यांनी दलित साहित्याला जे वेगळे व्यासपीठ निर्माण करून दिले आहे. त्याचप्रकारे त्यांनी विविध विषयांना आणि घटनांना स्तंभलेखनाद्वारे समाजापुढे मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केला आणि तो यशस्वीही झाला. आणि त्याचा प्रत्यय म्हणजे 'अर्थ आणि अन्वयार्थ' होय.

यावरूनच त्यांचे आपल्याला वेगळे असे व्यक्तिमत्त्व पाहता येते आणि म्हणूनच त्यांचे हे साहित्य संशोधनासाठी योग्य ठरते. त्यामुळेच त्यांनी सर्व साहित्यलेखनाबरोबर स्तंभलेखनही उत्कृष्ट असे केलेले आपणास दिसून येते.

समाजातील विविध घटनांचा अन्वयार्थ लावायचा असेल तर खरोखरच मानवी जीवनाच्या अंतरंगाचा शोध घ्यावा लागतो. हा शोध घेण्याचा प्रयत्न गंगाधर पानतावणे यांनी वारंवार केला आहे. त्यामध्ये उदा. ''ज्याप्रमाणे केवळ कल्पकतेमुळे किंवा साहित्याच्या अभ्यासामुळे निर्माण झालेले साहित्य श्रेष्ठ ठरत नाही; ज्याप्रमाणे समाजचित्रण रेखाटले की ती कलाकृती श्रेष्ठ ठरणार नाही. साहित्यनिर्मात्याला जीवनासंबंधी सखोल आस्था असावी लागते. त्याचे समाज जीवनाविषयी चिंतन व्यापक असावे लागते. एवढेच नाहीतर सामाजिक जीवनातील द्वंद्वाचे त्याचे आकलन अंर्तभेदी असावे लागते. मानवी जीवनाच्या अंतरंगाचा निरंतर शोध, हीच श्रेष्ठ साहित्याची खूण असते. हा शोध न संपणारा असतो. म्हणूनच सामाजिक प्रबोधनवादी साहित्य निर्मात्याला समाज प्रवाहाच्या काठाकाठाशी पोहून चालत नाही, त्याला आत उडी घ्यावी लागते. बुडी मारावी लागते. मगच त्याची साहित्य स्फुरणे संवेद्य आणि श्रेष्ठ प्रतीची ठरतील. साहित्य निर्मात्याचे वाङ्मयीन व्यक्तित्व येथेच आकाराला येते. वैचारिकता ही वांझोटी नसावी, बुद्धिवादाची शाब्दिक कसरत नसावी. पोथीबंद अभिव्यक्ती नसावी. तर मानवी चेतनेचा तो आविष्कार असावा. मानवी सृजनाचे मानवी तत्त्वज्ञान असावे.''

अशा प्रकारचे गंगाधर पानतावणे यांचे साहित्यविचार पाहिल्यानंतर साहित्यनिर्मिती करत असताना आपल्याला मानवी जीवनाचा अंतरंगाचा शोध त्याचबरोबर त्यांचे सामाजिक जीवन या सर्वांचा जवळून अभ्यास केला तरच साहित्य निर्मिती उत्कृष्ट होऊ शकते. त्याचप्रमाणे गंगाधर पानतावणे यांनी सर्वांचे जवळून निरीक्षण केले आहे याचा प्रत्यय आपणास त्यांच्या 'अर्थ व अन्वयार्थ' या ग्रंथावरून येतो. या ग्रंथामध्ये त्यांनी अनेक व्यक्तीच्या जीवनाचा शोध फार जवळून घेतलेला आपणास जाणवतो. त्याचबरोबर त्यांनी अनेक सामाजिक राजकीय प्रश्नांचा त्यांनी सखोल असा अभ्यास केला आहे. आणि त्यावरूनच त्यांनी मानवी जीवन आणि त्यांच्या समस्या, त्यांचे प्रश्न याचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे.

## दलित, ग्रामीण, आदिवासी जनवादी साहित्य

डॉ. गंगाधर पानतावणे यांनी दलित, ग्रामीण, आदिवासी, जनवादी साहित्य हे स्वातंत्र्योत्तर काळातील मराठीतील महत्त्वाचे साहित्य प्रवाह आहेत. यासंबंधी स्पष्ट आणि निर्भीड भूमिका गंगाधर पानतावणे यांनी मांडलेली आहे. केवळ दलित साहित्य चळवळीचे त्यांनी नेतृत्व केल्यामुळे त्याच साहित्याची बाजू घेत नाहीत तर ग्रामीण, जनवादी, आदिवासी या साहित्यप्रवाहांचीही ते चिकित्सा करतात. मराठी साहित्याला गुणवत्ता देण्याचे आणि समृद्ध करण्याचे काम या साहित्य-प्रवाहांनी केले आहे असे ते म्हणतात. या वाङ्मयीन प्रवाहांनी साहित्याची स्वायत्तता कधीच नाकारलेली नाही असे ते म्हणतात.

''ही साहित्य निर्मिती आशयाला प्राधान्य देते, रचनातंत्राला नाही. त्यामुळे या आशयवादी साहित्याने प्रस्थापित व रूढ साहित्य जाणिवांना हादरा दिला आहे हे निश्चित. आत्मसृष्टीच्या आणि स्थिर आदर्शाच्या वर्चस्वातून साहित्याला मुक्त करण्याचे ऐतिहासिक कार्य दलित आणि ग्रामीण या नव्या साहित्यप्रवाहांनी केले आहे.''

डॉ. गंगाधर पानतावणे ही सारी परिस्थिती प्रकट करतात. त्याचबरोबर त्यांनी दलित आणि ग्रामीण साहित्य प्रवाहांबद्दल बोलताना या दोन साहित्य प्रवाहांचा अन्वयार्थ लावण्यासाठी फक्त समीक्षा नको तर समीक्षकांच्या समाजशास्त्रीय आणि सांस्कृतिक दृष्टिकोनाची नितांत गरज आहे असे ते म्हणतात.

गंगाधर पानतावणे यांनी वरील सर्वच साहित्यप्रवाहाबद्दल एक वेगळीच वाङ्मयीन भूमिका मांडलेली आहे. त्यांची वाङ्मयीन भूमिका डोळस, प्रामाणिक, चिंतनशील व अंतर्मुख करणारी

अशी आहे. एका सर्जनशील साहित्यिकाची तळमळ आणि उपेक्षितांच्या प्रज्ञा व प्रतिभेला त्यांनी हाक दिलेली आहे. याबद्दल ते आपले मत प्रकट करताना ते म्हणतात - "या सर्व वाङ्मयीन प्रवाहांचे प्रेरणास्त्रोत भिन्न-भिन्न असले तरी समाजभाव राखणाऱ्या त्या वाङ्मयीन प्रवृत्ती आहेत. या सर्व प्रवाहांनी ऐतिहासिक गरज म्हणून एकवटण्याचा ध्यास घेतलेला आहे. तर भारतीय वाङ्मयीन आणि सांस्कृतिक भवितव्यता ही याच प्रवाहांची असेल यात मला शंका वाटत नाही. वाङ्मयीन व सांस्कृतिक केंद्र बदलण्याचे सामर्थ्य आजतरी याच प्रवाहात आहे. म्हणूनच या सर्व वाङ्मयीन प्रवाहांचा सहप्रवासच नव्हे तर एकमय प्रवास होण्याची गरज आहे. त्यासाठी 'एक मंच : एक उद्घोष' हवा."

अशाप्रकारे गंगाधर पानतावणे यांनी आपले साहित्यिक विचार प्रकट केले आहेत आणि त्यांनी वेगवेगळ्या वाङ्मयीन प्रवाहामध्ये ग्रंथलेखन केले आहे. आणि जे ग्रंथलेखन केले आहे ते वैचारिक आणि मार्गदर्शनीय असे साहित्य लेखन केले आहे. डॉ. बाबासाहेबांच्या विचार प्रेरणेतून त्यांनी दलित साहित्याची चळवळ केली ते नेहमीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्याबद्दल बोलताना,

"साहित्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनासंबंधी नवी जाणीव दलित साहित्याने दिली ... डॉ.बाबासाहेब आंबेडकर ह्या व्यक्तीने आंबेडकर नावाच्या विचाराने नवा दलित घडविला. यांत्रिक युगाने नव्हे. यंत्रयुगाने साधने दिली. पण आंबेडकरी विचाराने आत्मस्थितीची जाणीव आणि आत्ममूल्य दिले. दलित हा नवा अनुभव झाला. नवी जाणीव झाली. विद्रोह, विज्ञान, विश्वमयता ही दलित साहित्याची त्रिसूत्री आहे, असे मी मानतो ... आत्मविद्रोह, समाज, संस्कृती आणि साहित्य या तिन्हींच्या संदर्भात त्यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. दलित साहित्याचा तो तेजस्वी विशेष होय. हा आत्मविद्रोह, विद्रोहा इतकाच कठोर आणि नव्या रचनेसाठी आसुसलेला आहे."

अशाप्रकारचे विविध विचार त्यांनी प्रकट केले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित साहित्याचे आधारस्तंभ आहेत.

अशाप्रकारे डॉ. गंगाधर पानतावणे हे नाव आज मराठी साहित्य विश्वात आदराने घेतले जाते. त्यांनी मराठी साहित्यात वेगवेगळ्या प्रकारचे लेखन तर केले आहेच तसेच दलित साहित्य चळवळीच्या संदर्भात तर त्यांचा उल्लेख अटळपणे केला जातो. सर्जनशील कलावंत, लेखक, परिवर्तनवादी, कृतीशील विचारवंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार आणि चळवळीचे भाष्यकार, अनेक दलित लेखकांच्या पिढ्यांना प्रकाश दाखवणारे 'अस्मितादर्श' नियतकालिकाचे

संपादक अशा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यांनी पंचेचाळीस वर्षे साहित्य चळवळीत ते सातत्यपूर्ण कार्यरत आहेत. त्यांनी वेगवेगळ्या प्रकारची पंचवीस पुस्तके लिहिली आहेत. अनेक ग्रंथांना त्यांनी प्रस्तावना लिहिल्या आहेत. अनेक मान-सन्मान आणि पुरस्कारांचे ते मानकरी ठरले आहेत. महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर फुले आंबेडकरी विचारांचा अन्वयार्थ सांगतात. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठात त्यांनी व्याख्याने दिली आहेत. महाराष्ट्रात ठिकठिकाणी वेगवेगळ्या संस्थांनी जी साहित्यसंमेलने आयोजित केली त्याचे अध्यक्ष स्थान त्यांनी भूषविले. त्यांनी अध्यक्षस्थानावरून जी भाषणे दिली त्या भाषणाचे संकलन आणि संपादन 'साहित्य : शोध आणि संवाद' या ग्रंथात केले आहे.

डॉ. गंगाधर पानतावणे यांच्यासारख्या बहुमुखी प्रतिभा असलेल्या आणि बहुमिती व्यक्तिमत्त्व लाभलेल्या साहित्यिकाच्या भाषणांचा आणि मुलाखतींचा संग्रह जाणकारांबरोबरच सामान्य वाचकांना, परिवर्तनाच्या चळवळीतील लेखक कार्यकर्त्यांना आणि अनेक समाज थरातील, वाङ्मयीन प्रवाहातील लेखक कवींना मार्गदर्शक ठरेल.

अशाप्रकारे गंगाधर पानतावणे यांनी जे ग्रंथलेखन केले. संपादित ग्रंथ, ग्रंथपुरस्कार, विविध संस्थांवर प्रतिनिधित्व व कार्य, पुरस्कार, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय सहभाग, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्य, काही अध्यक्षीय भाषणे, काही महत्त्वाच्या परिषदा, चर्चासत्रे व उद्घाटने, काही महत्त्वपूर्ण व्याख्याने अशा प्रकारचे विविध वाङ्मयीन कार्याचा आढावा परिशिष्टामध्ये घेतला आहे.

## निष्कर्ष

१. विदर्भात जन्माला आलेल्या पानतावणे यांनी घरच्या दारिद्र्याशी लढत कष्टातून जिद्दीने प्रसंगी मोलमजूरी करून स्वत:चे शिक्षण पूर्ण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांची प्रेरणा होती.

२. गंगाधर पानतावणे यांनी बाबासाहेबांच्या १४ ऑक्टोबर १९५६ रोजी घेतलेल्या धम्म दीक्षेच्या कार्यक्रमात पानतावणे हजर होते. ती प्रेरणा घेऊनच सारे वाङ्मयीन कार्य केले.

३. गंगाधर पानतावणे यांनी समीक्षणात्मक, संशोधनात्मक आणि वैचारिक लेखनात मराठी साहित्याची चिकित्सक पद्धतीने मांडणी. दलित लेखक, दलित विचारवंत, त्यांच्या लेखनाचा शोध आणि मांडणी, मराठी साहित्याला त्यांचे योगदान या सर्वांमधून त्यांना आपल्या लेखनाची वाट सापडली.

४. साहित्य व समाज यांचा अनुबंध, साहित्य आणि संस्कृती यांचा परस्पर संबंध याचा नव्या दृष्टीने शोध घेऊन त्यांची समीक्षणात्मक मांडणी, मूल्यवेध लेणी, साहित्य, प्रकृती आणि प्रवृत्ती, साहित्यरोध आणि संवाद या पुस्तकातून केली आहे.

५. गंगाधर पानतावणे यांनी आपल्या लेखनाची सुरुवात कवितेने केली. काही दर्जेदार नियतकालिकांतून त्यांच्या कविता प्रसिद्ध ही झाल्या. पण ते कवितेत फार काळ रमले नाहीत. त्यानंतर त्यांनी लोकसाहित्याचा अभ्यास केला. काही लोकगीते, लोककथा संकलित केल्या. त्यानंतर एक नाटक आणि दोन एकांकिका तसेच एक भाषांतरीत नाटक गुलाम या नावाने लिहिले व त्याचे काही प्रयोगही केले.

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे त्यांच्या कार्याचे, विचारांचे, लेखनाचे प्रेरणास्थान आहे. डॉ. आंबेडकरांचे लघु चरित्र म्हणजे मूकनायक हा चरित्रात्मक ग्रंथ होय.

७. स्मृतिशेष या ग्रंथात त्यांनी त्यांच्या सहवासात आलेल्या काही अक्षरसोबतीचे अकाली निधन झाल्यानंतर अत्यंत हळूवार, संवेदनशील मनाने त्यांच्या आठवणींना शब्दरूप दिले आहे.

८. गंगाधर पानतावणे यांनी आपल्या पीएच. डी. या पदासाठी संशोधन विषय पत्रकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर हा घेतला होता आणि अत्यंत परिश्रमपूर्वक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा एक दुर्लक्षित पैलू पुढे आणला.

९. अस्मितादर्श हे त्रैमासिक गंगाधर पानतावणे यांची ओळख आहे. गेली ४१ वर्षे त्यांनी एकहाती त्रैमासिक प्रसिद्ध केले. नव्या लेखन कवींना हक्काचे माध्यम मिळवून देणारे अस्मितादर्श हे दलित साहित्य चळवळीचे आधारवड आहे. आंबेडकरवाद हीच अस्मितादर्शची प्रेरणा, प्रतिज्ञा व जीवनदृष्टी आहे. या प्रेरणेतूनच त्यांनी संदर्भ मूल्य असणारे दलित चळवळीला प्रेरणा देणारे विशेषांक काढले आहेत. दरवर्षी भरणारा अस्मितादर्श मेळावा हा विचारांचा उत्सव आणि सामाजिक, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन विषयांवरची चर्चा म्हणजे वैचारिक मंथन असते.

१०. चैत्य या पुस्तकात त्यांनी अनेक पुस्तकांना दिलेल्या प्रस्तावनांचा संग्रह आहे. या प्रस्तावनामध्ये संबंधित पुस्तक व लेखकाविषयी लिहिण्याबरोबरच पानतावणे यांचे मुक्त चिंतनही वाचायला मिळते.

११. गंगाधर पानतावणे हे वृत्तीने संशोधक होते. हे त्यांच्या वृत्तीतून दलितांचे प्रबोधन या पुस्तकामध्ये त्यांनी संशोधनपूर्वक दलित समाजातील विचारवंत, समाजक्रांतीकार यांच्या योगदानाचे मूल्यात्मक विवेचन आणि त्यातून दलित समाजाचे प्रबोधन केले आहे.

१२. वादळाचे वंशन या पुस्तकात डॉ. आंबेडकर पूर्व काळात दलित मुक्तीसाठी प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींचा शोध घेतला आहे. प्रबोधनाच्या दिशा या ग्रंथात फुले, आंबेडकर, शाहू यांच्या कार्याचा चिकित्सक अभ्यास, मार्क्स-आंबेडकर यांच्या समन्वयाला केलेला साधार विरोध आहे. तर दलित वैचारिक वाङ्मय या ग्रंथामध्ये संशोधनपूर्वक सिद्ध केलेले दलित समाजातील विचारवंताचे कार्य मांडले आहे.

१३. गंगाधर पानतावणे यांनी ज्या ताकदीने वैचारिक, संशोधनात्मक आणि समीक्षात्मक लेखन केले त्याच ताकदीने स्तंभलेखनाच्या रूपाने ललित लेखनही केले. विविध नियतकालिके आणि वर्तमानपत्रातील स्तंभलेखनाची त्यांची तीन पुस्तके आहेत. 'विद्रोहाचे पाणी पेटले आहे' या स्तंभलेखनात आंबेडकर चळवळीतील निष्ठावान कार्यकर्ते, शाहीर, कवी, लेखक, विचारवंत यांच्या कार्याचा मागोवा घेतला आहे. तर 'हलगी' या स्तंभलेखनामध्ये समाज आणि व्यक्ती यांच्या सूक्ष्म निरीक्षणातून उपरोध उपहास यांच्या माध्यमातून त्यांनी मिश्किल व उपहासगर्भ लेखन केले आहे. 'अर्थ आणि अन्वयार्थ' या पुस्तकात त्यांनी अनेक विषयांना स्पर्श केलेला आहे. यातून ललित आणि विचार यांचा सुंदर मिलाफ दिसतो. आजुबाजूला घडणाऱ्या घटना, प्रसंगांचा अन्वयार्थ लावण्याचा लालित्यपूर्ण, ओघवत्या भाषेत प्रयत्न केला आहे.

१४. गंगाधर पानतावणे यांचे आजपर्यंत १५ विविध विषयांवरील ग्रंथलेखन प्रसिद्ध झाले आहे. त्यांना विविध ग्रंथ पुरस्कार मिळाले आहेत. विविध सन्माननीय, शासकीय आणि वाङ्मयीन समित्यावर त्यांनी कार्य केले आहे. १६ विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सन्मान प्राप्त झाले आहेत. विविध साहित्य संमेलनातून अध्यक्षस्थान भूषवित अभ्यासपूर्ण, संस्मरणीय अध्यक्षीय भाषणे दिली आहेत. अनेक व्याख्याने आणि चर्चासत्रात सहभाग घेतला आहे.

## संदर्भ ग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १. | पानतावणे गंगाधर | 'मूल्यवेध', पृ. क्र. २६ |
| २. | पानतावणे गंगाधर | 'विद्रोहाचे पाणी पेटले', पृ. क्र. १६९ |
| ३. | पानतावणे गंगाधर | 'वादळाचे वंशज', पृ. क्र. ४४ |
| ४. | तत्रैव | पृ. क्र. ४७ |
| ५. | जाधव मनोहर, केशव देशमुख, ऋषीकेश कांबळे | 'साहित्य समाज आणि संस्कृती', पृ. क्र.१७८ |
| ६. | तत्रैव | 'साहित्य समाज आणि संस्कृती',पृ. क्र. २०० |
| ७. | तत्रैव | 'साहित्य समाज आणि संस्कृती',पृ. क्र. १८५ |
| ८. | तत्रैव | 'साहित्य समाज आणि संस्कृती', पृ. क्र. १६४ |
| ९. | तत्रैव | 'साहित्य समाज आणि संस्कृती', पृ. क्र. |
| १०. | तत्रैव | 'साहित्य समाज आणि संस्कृती', पृ. क्र. १८९, १९० |
| ११. | तत्रैव | 'साहित्य समाज आणि संस्कृती', पृ. क्र. १९० |
| १२. | पानतावणे गंगाधर | 'दलित वैचारिक वाङ्मय', मुंबई विद्यापीठ प्रकाशन, पृ. क्र. ९ |
| १३. | पानतावणे गंगाधर | 'वादळाचे वंशज', पृ. क्र. ५, ६ |
| १४. | जाधव मनोहर, केशव देशमुख, ऋषीकेश कांबळे | 'साहित्य समाज आणि संस्कृती', पृ. क्र.४ |
| १५. | तत्रैव | पृ. क्र. ४ |
| १६. | तत्रैव | पृ. क्र. ४ |
| १७. | पानतावणे गंगाधर | 'अर्थ आणि अन्वयार्थ', प्रतिमा प्रकाशन, पुणे. |
| १८. | पवार सुधाकर, येवलेकर अनंत | 'उपयोजित अभ्यासक्रम, मराठी भाषेची संवाद कौशल्ये, वृत्तपत्र संवादाचे स्वरूप', पुस्तक पाचवे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक |

१९. प्रतिष्ठान २००४, २५ वे मराठवाडा साहित्य संमेलन, परभणी संमेलन विशेषांक, मार्च एप्रिल २००४

२०. पानतावणे गंगाधर (१९८८) 'दलित वैचारिक वाङ्मय', मुंबई विद्यापीठ प्रकाशन,

-----x-----